## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९६३/२०११.

श्री. गंगाराम जंगू आडे,
रा. जंगुगुडा, पो. लक्कडकोट,
ता. राजूरा, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. राजूरा, जि. चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा,
तहसीलदार,
राजूरा, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.१०.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, राजूरा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन सिलिंग मामला क्र. ११९/६० अ(५)/१९७५-७६ मौजा लक्कडकोट या प्रकरणात दिनांक २५.७.१९८९ ला पारित केलेल्या आदेशाची, रोजनाम्याची, बयानाची प्रमाणित प्रत व सविस्तर माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे लेखी निवेदन सादर करुन मला तहसीलदार, राजूरा यांचेकडून मी मागितलेली संपूर्ण माहिती मला मिळालेली आहे. करिता मी दाखल केलेला अपील अर्ज स्वखुशीने मागे घेत आहे असे कळविले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

... २

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-    दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०६१- १०६२/ ३.१०.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९६४/२०११.**

श्री. मुरलीधर पुंडलिकराव गुल्हाणे,
रा. गरोबा मैदान, बगडगंज पोस्ट ऑफीस समोर,
नागपूर - ४४० ०८८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जलप्रदाय विभाग, महानगरपालिका,
धरमपेठ, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा,
उपअभियंता,
जलप्रदाय विभाग, लकडगंड झोन क्र. ८,
महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा जलप्रदाय विभाग, झोन क्रमांक ८, लकडगंज, महानगरपालिका नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन नळ कनेक्शन दिल्याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती मिळाली असून आता माझे समाधान झाले आहे. आता माझे काहीही म्हणणे नाही तरी मी केलेला अर्ज मागे घेत आहे असे लेखी निवेदन दिनांक २३.९.२०११ रोजी राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांचेकडे सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

... २

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९७४/२०११.

श्री. वसंत मार्कंडी सादुलवार,
मु. पो. चिरोली, ता. मूल, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, मुल,
जि. चंद्रपूर.

श्री. डी. पी. मेकलवार,
जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, चिरोली,
ता. मुल, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.१०.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ६.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, चिरोली यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिरोली येथील शिक्षक मुख्यालयी राहतात त्याबाबत घेतलेल्या ठरावाची प्रत, तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील काम्प्युटर बिल्डींग बांधकाम इस्टीमेटची प्रत, कामावरील खर्चाचे विवरण इत्यादींची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडून दिनांक ४.५.२०११ च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीमध्ये त्यांना कॉम्प्युटर बिल्डींग बांधकाम स्टीमेट प्रत प्राप्त झाली नाही. तसेच ठरावाची स्पष्टप्रत प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

... २

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ६.४.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन त्यांनी अपीलकर्त्यास दिनांक ४.५.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी त्यावेळी बिल्डींग इस्टीमेंटच्या कामाची प्रत त्यांचे जवळ उपलब्ध नव्हती म्हणून इस्टीमेटची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता आली नाही. तथापी त्यांनी आता इस्टीमेटची प्रत प्राप्त करुन घेतली असून त्याची प्रत त्यांनी आयोगासमोर अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. तसेच अपीलकर्त्यास ठरावाची स्पष्ट प्रत पुन्हा आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने स्विकृत करुन समाधान व्यक्त केले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपल हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०६५- १०६६/ ४.१०.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९७३/२०११.**

श्री. वामनराव बाळकृष्ण सिंगम,
शिवाजी नगर, तुकूम वार्ड क्र. ३, बँकेजवळ,
ता. जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी (गट-अ),
जिल्हा परिषद, नागपूर.

सौ. सुनंदा मुश्रीफ,
जनमाहिती अधिकारी तथा,
अधिक्षक,
समाज कल्याण विभाग,
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.१०.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २०.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन सरस्वती बहुउद्येशिय शिक्षण संस्थेद्वारा संचालित राजीव गांधी मुकबधीर/अंध/अस्थिव्यंग या ३ संस्था केंव्हापासून सुरु झाल्या. त्यांचे लायसन्स कधी प्राप्त झाले. सुरुवातीपासून नेमलेल्या कर्मचारी वर्ग त्यांचे नियुक्तीचे आदेशाची

प्रत, कर्मचाऱ्यांचे हजेरीपटाची प्रत, त्या प्रत्येक संस्थेतील विद्यार्थ्यांची संख्या, नाववार, महिना व वर्षवार कर्मचाऱ्यांना चेकने पेमेंट झाले काय इत्यादीबाबत सन १९९४ ते ३१ मार्च २०११ या कालावधीची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दिनांक १८.५.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १०.६.२०११ रोजी देण्यात आला व अपीलकर्त्यास, अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक, सरस्वती बहुउद्देशीय संस्था, काटोल यांनी अपीलकर्त्यास १५ दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिला. मात्र त्यानंतरही त्यांना संस्थेकडून माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २०.४.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २७.४.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सचिव/मुख्याध्यापक, सरस्वती बहुद्देशीय शिक्षण संस्था, काटोल यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांनी दिनांक २.५.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांचेकडे हस्तांतरण करुन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले व त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठवून त्यामध्ये असे नमुद केले की, आपण मागितलेली माहिती शाळेशी संबंधित असल्यामुळे त्यांचेकडे माहितीचा अर्ज पाठविण्यात येत आहे. त्यांचेशी संपर्क साधून माहिती प्राप्त करावी असे अपीलकर्त्यास कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी नमुद केले. सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. मात्र त्यांना संस्थेकडून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दाखल केले. समाज कल्याण अधिकारी यांनी दिनांक १०.६.२०११ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देऊन मुख्याध्यापकांनी अपीलकर्त्यास माहिती १५ दिवसात उपलब्ध करुन द्यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय दिल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. आजच्या सुनावणीस सरस्वती बहुउद्देशीय शिक्षण संस्था, काटोल या संस्थेचे अध्यक्ष, श्री. रतिराम रेवतकर हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे लेखी निवेदन सादर केले. त्यामध्ये त्यांनी असे नमुद केले की, ज्या

संस्थेस शासनाचे अनुदान मिळत नाही त्यांना माहितीचा अधिकार लागू होत नाही. तसेच अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तथापी याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, सरस्वती बहुउद्देशीय शिक्षण संस्था, काटोल या संस्थेद्वारे सन १९९४ पासून राजीव गांधी मुक बधीर विद्यालय, काटोल ही मुकबधीरांसाठी शाळा चालविण्यात येत आहे. या शाळेस दिनांक ४.३.२०१० चे शासन निर्णयाप्रमाणे अनुदान तत्वावर मान्यता मिळाली आहे. या शाळेस रुपये ४००००/- अनुदान मे २०११ मध्ये मिळाले आहे म्हणून प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, सरस्वती बहुउद्देशीय शिक्षण संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या मुकबधीर शाळेला शासनाचे अनुदान प्राप्त झाल्यामुळे या संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या मुकबधीर/अंध/अस्थीव्यंग या ३ ही शाळेची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. कारण सरस्वती बहुउद्देशीय शिक्षण संस्था, काटोल द्वारा चालविण्यात येणाऱ्या मुकबधीर शाळेला शासनाचे अनुदान प्राप्त झालेले आहे. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी या संस्थेस लागू होतात. म्हणून संस्था अध्यक्ष/सचिव/ मुख्याध्यापक यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. त्याकरिता अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दिनांक १०.७.२०११ मधील दिलेल्या निर्णयानुसार अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक सरस्वती बहुउद्देशीय शिक्षण संस्था, काटोल द्वारा संचालित राजीव गांधी मुकबधीर/अंध/अस्थीव्यंग निवासी विद्यालय, काटोल यांची माहिती हा आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत अपीलकर्त्यास त्यांचाकडील दिनांक २०.४.२०११ च्या माहिती अर्जाप्रमाणे विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०६७- १०६९/ ४.१०.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९७०/२०११.**

श्री. मनोज सत्यनारायणजी शर्मा,
तंबाखु ओळी, ता. कामठी, जि. नागपूर - ४४१ ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विनय मून,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
नागपूर.

श्री. पी. पी. बोमीडवार,
जनमाहिती अधिकारी तथा,
जिल्हा खनिकर्म अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याने दिनांक १४.३.२०११ च्या माहितीच्या अर्जान्वये त्यांचे कार्यालयाकडे विटभट्टीच्या संबंधित एकूण १५ मुद्यांवर प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितलेली होती. तसेच सदरची माहिती संपूर्ण नागपूर जिल्हयातील

रामटेक परिक्षेत्रातील मागितलेली होती. तथापी अपीलकर्त्याने सदरच्या माहितीच्या अर्जात निश्चित स्वरुपात दस्ताऐवज किंवा अभिलेख, ज्ञापने इत्यादी माहिती कलम २(च) प्रमाणे मागितलेली नव्हती म्हणून याबाबत अपीलकर्त्याशी प्रत्यक्ष त्यांचे कार्यालयात चर्चा केली व चर्चेमध्ये त्यांना निश्चित स्वरुपाची जी माहिती पाहिजे आहे त्याबाबत स्पष्टता करुन मागितली. मात्र अपीलकर्त्याने कोणतेही दस्तऐवजाची मागणी केली नाही. मात्र त्यानतर त्यांनी प्रथम अपील अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे दिनांक २७.४.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २७.५.२०११ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिला व त्या निर्णयामध्ये असे नमुद केले की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) नुसार अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज निगडीत नाही. तथापी जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध रेकॉर्डमधून जी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता येईल ते देण्याचे आदेश प्रथम अपीलात दिले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दिनांक २७.५.२०११ च्या प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १६.६.२०११ च्या पत्राने त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेली श्री. सुशिल फुलचंद शर्मा यांच्या मौजा पंचाळा (खुर्द) ता. रामटेक येथील खनिपट्टा संबंधात माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन दिली. त्यामध्ये परवानगी आदेशाची प्रत, करारनाम्याची छायांकित प्रत, अधिकार शुल्क निरिक्षक निरिक्षण अहवाल, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर यांचे रिट याचिका क्रमांक ४०७७/२००९ मधील आदेशाची छायाप्रत इत्यादी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले. अपीलकर्त्यास दिनांक १६.६.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या पत्राची प्रत आयोगासमोर सादर केली त्यावरुन असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या रेकॉर्डमधील जी माहिती देता येणे शक्य आहे ती माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९७२/२०११.**

श्री. अरुण कुमार कृष्णरावजी बालपांडे,
श्रीमती सुभद्राबाई लेंडे स्मृती निवास,
खदान हंसापूरी, नागपूर - ४४० ०१८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. सी. सुर्यवंशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख,
नागपूर.

श्री. कमलाकर हट्टेकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
नगर भूमापन अधिकारी क्रमांक - ३,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. आज सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १५.३.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदरच्या माहितीच्या अर्जात अपीलकर्त्याने मौजा सोमलवाडा, शीट

... २

नं. ६७३/९, फाइनल नं. ४९४, ओल्ड सर्वे नं. ३५ (पार्ट) व पंचदीपनगर येथील झोपडपट्टी विकासाच्या योजनेबाबत नकाशाची प्रत मागितलेली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ८.४.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की, मौजा सोमलवाडा येथील ख. क्र. ३५, नगर भूमापन क्रमांक ४९४ असून आझाद हिंद गृह निर्माण सोसायटी व नागभूमी गृह निर्माण सोसायटी असे नांव अभिलिखीत नोंद आहे व इतर धारकाचे नोंदी आहेत. नकाशा अभिलेखात खुली जागा दर्शविले आहे. झोपडपट्टी विकास योजना संदर्भात कोणत्या योजना सुरु आहेत त्याची माहिती या कार्यालयामध्ये नसल्याने माहिती पुरविता येत नाही. तसेंच पंचदीपनगर येथील झोपडपट्टीची ईकडील कार्यालयात नोंद नाही. आपणास आखीव पत्रिका व नकाशाची सत्यप्रतीची आवश्यकता असल्यास शासकीय नियमाप्रमाणे लागणारी फी रुपये ४३०/- चा भरणा करुन प्राप्त करुन घेता येईल अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे दिनांक २८.४.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.६.२०११ रोजी देण्यात आला व प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या माहितीची फी भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय दिल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तथापी प्रथम अपीलाचे निर्णयानंतर देखील अपीलकर्त्याने आखीव पत्रिकेच्या संबंधात व नकाशाचे संबंधात शुल्काचा भरणा केला नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले. तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा केल्यास जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे त्यांना दिनांक ८.४.२०११ च्या पत्राने कळविल्यानुसार माहितीचे शुल्क भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९८५/२०११.**

श्री. अरुण अमृत गवई,
सी. पी. डब्ल्यू. डी. क्वॉर्टर नं. २७,
टाईप तीन (जुना) सिव्हील लाईन,
नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अकोला.

जनमाहिती अधिकारी तथा,
शिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ५.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अकोला यांचेकडे रेव्हन्यु अपील नं. आरटीएस-६२/लोनाग्रा, याबाबत एकूण ११ मुद्यांची माहिती मागितलेली होती. सदरच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा प्रस्तुतकार-२, उपविभागीय कार्यालय, अकोला यांचेकडून दिनांक २६.९.२०११ रोजीच्या पत्राने आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्ता यांनी दिनांक २८.९.२०११ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचेकडे माहिती मिळाल्याबाबतचे लेखी निवेदन सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९८९/२०११.

श्री. संजय नामदेवराव खैरकर,
राज्य माहिती आयोग कार्यालय,
नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती माधूरी मडावी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, रामटेक, जि. नागपूर.

श्री. एम. डी. तळवेकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्याध्यापक,
रामजी महाजन देशमुख नगर परिषद विद्यालय,
रामटेक, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.१०.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ५.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी नगर परिषद, रामटेक यांचेकडे दिनांक १५ जून २०१० ते दिनांक ३१ जुलै २०११ या कालावधीत जनगणनेचे काम केलेल्या शिक्षक कर्मचा-यांची एकूण ७ मुद्यांची माहिती मागितलेली होती. सदरच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचेकडे दिनांक १.१०.२०११ रोजी लेखी निवेदन सादर करुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २९.९.२०११ ला माहितीच्या मुद्यांचे समाधान केल्याने मी केलेले अपील मागे घेत आहे असे सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे. ... २

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९९९/२०११.**

श्री. रविंद्र तुकाराम हिवाळे,
गौतम नगर, भिवसन खोरी, दाभा,
पो. वाडी, ता. जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. व्ही. डी. मराठे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह आयुक्त,
महिला व बाल विकास आयुक्तालय,
पुणे - १.

जनमाहिती अधिकारी तथा,
परिविक्षा अधिक्षक,
महिला व बाल विकास आयुक्तालय,
पुणे - १. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. एस. एच. साळवी, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा परिविक्षा अधिक्षक, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचेकडे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, नागपूर यांचे सहाय्यक अनुदान योजनेबाबत पत्र दिनांक २७.६.२००९ ची माहिती मागितलेली होती. सदर माहिती अर्जाला अनुसरुन

... २

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१०.२०११ रोजी कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचेकडे लेखी निवेदन सादर करुन मला वरील बाबतीतचा चेक क्रमांक ३३९४२० भारतीय स्टेट बँक रुपये ५०००/- चा प्राप्त होत असल्याने मला माहिती मिळाली म्हणून मी माझी वरील अपील मागे घेत आहे असे लिहून दिले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८६८/२०११.**

श्री. बुध्दम यादोराव मेश्राम,
न्यु आशिर्वाद नगर, गिरोला (कारधा),
ता. जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आ. डो. पेदांराम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख,
भंडारा.

श्री. महेश आनंदा टिके,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपअधिक्षक, भूमी अभिलेख,
भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी त्या दिवशी सुनावणी न झाल्यामुळे दिनांक ११.१०.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, भंडारा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन दिनांक १ जानेवारी २०१० ते दिनांक २२.३.२०११ पर्यंत आपल्या कार्यालयाला अती तातडी भूमी मोजण्यासंबंधी तलाठी कार्यालय, वाकेश्वर, सा.झा.क्र. २८ अंतर्गत अति तातडी मोजणीकरिता एकूण किती अर्ज आले व त्यापैकी किती प्रकरण मोजणी केली त्याबाबतची माहिती

... २

तसेच मोजणी संबंधी शासन नियमावलींची साक्षांकित प्रत व मौजे वाकेश्वर येथील केवलराम मन्साराम लेंडारे यांची शेती व पोट हिस्सा मोजणी करुन त्यांना मोजणी अहवाल व क प्रत दिली ती त्यांनी मागितलेली होती. तसेच अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील असल्याबाबत त्यांनी दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र जोडलेले होते. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २८.३.२०११ च्या पत्राने माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले. मात्र ते दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांनी माहितीचे शुल्क भरले नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ३.५.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, भंडारा यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २२.३.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक २८.३.२०११ च्या पत्राने माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले. तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती देता आली नाही. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र ते दारिद्रयरेषेखालील असल्यामुळे त्यांनी माहितीचे शुल्क भरले नाही त्यांना विनामुल्य माहिती मिळावी अशी विनंती त्यांनी आयोगासमोर केली.

४. याबाबत जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांचे कार्यालयातून उपलब्ध करुन द्यावयाच्या प्रती बाबत आकारावयाचे शुल्क हे त्यांचे विभागाने ठरविलेले आहे. म्हणून अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावयाची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली असून ती अपीलकर्त्यास विनामुल्य देण्याची तयारी त्यांनी आयोगासमोर दर्शविली. म्हणून सदरची माहिती आयोगासमोर विनामुल्य अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत करुन समाधान व्यक्त केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १००३/२०११.

श्री. ईश्वर उपासराव चकोले,
रा. मंगळवारी प्राथमिक शाळेजवळ,
मंगळवारी पेठ, ता. उमरेड, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. रविंद्र भेलावे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, उमरेड,
जि. नागपूर.

श्री. एच. एन. झाडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
प्रभारी प्रशासकीय अधिकारी,
नगर परिषद, उमरेड, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक १८.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी नगर परिषद उमेरड, जि. नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन नगर परिषद, उमरेड येथे जन्म, मृत्यु नोंदणीचे उपनिबंधक कोण आहेत. तसेच श्री. हरिश्चंद्र झाडे यांना जन्म, मृत्यु नोंदणीचे उपनिबंधकाचे अधिकार प्रदान

... २

केल्याची शासनाचे आदेशाची प्रत. त्याचप्रमाणे जन्म, मृत्यु नोंदणीचे प्रमाणपत्रावर सही करण्याचे दिलेले अधिकार इत्यादी बाबत त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ७.५.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली तथापी त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी, नगर परिषद, उमरेड यांचेकडे दिनांक १६.५.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १७.६.२०११ रोजी घेण्यात आली व सुनावणीनंतर त्यांचे प्रथम अपील खारीज केले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १८.४.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयात प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व सदरची माहिती अपीलकर्त्यास दिनांक ७.५.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिली व सदरच्या माहितीमध्ये असे नमुद केले की, नगर परिषदेच्या सर्व साधारण सभा दिनांक २५.५.२००५ ठराव क्रमांक ८ मध्ये निबंधक व उपनिबंधकांचे अधिकार प्रदान करण्याबाबतचा उल्लेख आहे म्हणून त्या ठरावाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली व तसेच निबंधक व उपनिबंधक यांचे अनुपस्थितीत मा. निबंधक तथा मुख्याधिकारी यांचे निर्देशानुसार कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना स्वाक्षरीचे अधिकार देण्यात येत असतात असे देखील अपीलकर्त्यास कळविण्यात आले. मात्र याबाबत अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, जन्म मृत्युच्या प्रमाणपत्रावर ज्या अधिकाऱ्यांनी सहया केलेल्या आहेत त्यांच्या नावांचा उल्लेख ठरावात नाही. याबाबत मुख्याधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, जन्म, मृत्युचे नोंदणीचे प्रमाणपत्रावर सहया करण्याचा अधिकार ज्या अधिकाऱ्यास आहे त्या अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे सर्व सामान्य नागरिकांना त्रास होण्याची शक्यता नाकारता येत नाही अशा प्रसंगी नागरिकांना सुविधा वेळेवर मिळण्याच्या दृष्टिने त्यांचे कार्यालयातील अन्य वरिष्ठ अधिकारी स्वाक्षरी करीत असतात व ही पध्दत कार्यालयीन कामकाजाचा महत्वाचा भाग आहे असे देखील मुख्याधिकारी यांनी आयोगासमोर स्पष्ट केले.

... ३

४.    अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ७.५.२०११ च्या पत्राने वर नमुद केल्याप्रमाणे आवश्यक ती वस्तुस्थितीदर्शक माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-    दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०८५- १०८७/ ११.१०.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १००१/२०११.**

श्री. नथ्थुजी दाजीबा वाहने,
प्लॉट नं. ९, ठवरे कॉलनी,
नविन सुभेदार नगर, नागपूर - ४४० ०२४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आ. बा. पाटील,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती पतंगे,
जनमाहिती अधिकारी तथा,
अधिक्षक, (शिक्षण विभाग माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ९.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक (माध्यमिक) शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन आनंद विद्यालय, भगवाननगर, नागपूर या शाळेची मान्यता रद्द करणे व पुर्ववत करणेबाबत झालेला संपूर्ण पत्र व्यवहाराची माहिती एकूण ७ मुद्यांवर त्यांनी मागितलेली होती. त्यांना दिनांक २५.३.२०११ च्या पत्राने असे

... २

कळविले की, आपण मागितलेल्या माहिती बाबत शाळा मान्यता काढणे व हस्तांतरण करणे ही प्रक्रिया शिक्षण उपसंचालक, नागपूर मार्फत कार्यान्वित होते. म्हणून आपण शिक्षण उपसंचालक, नागपूर कार्यालयाकडून सदरची माहिती प्राप्त करुन घ्यावी. सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दिनांक २९.३.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर दिनांक २४.५.२०११ च्या पत्राने त्यांना मुद्या क्रमांक ७ ची माहिती उपलब्ध झाली. मात्र मुद्या क्रमांक १ ते ६ ची माहिती उपलब्ध नसल्यामुळे पुरविता येत नाही असे त्यांना कळविले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ९.३.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक २५.३.२०११ च्या पत्राने व दिनांक २४.५.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्त्याने माहिती अर्जात नमुद केलेली काही माहिती ही सन २००४-०५, २००५-०६ या कालावधीतील पत्राच्या प्रती त्यांनी मागितल्या होत्या. परंतु सदरची माहिती त्यांचे कार्यालयात शोध घेऊनही उपलब्ध झाली नाही. तथापी मुद्या क्रमांक ७ च्या संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध झाली व ती माहिती अपीलकर्त्यास त्यांनी उपलब्ध करुन दिल्याचे नमुद केले. याबाबत अपीलकर्त्याने आयोगासमोर शासनाकडून दिनांक २८.९.२०११ च्या पत्राने शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांनी पाठविलेले पत्राची प्रत या संबंधात सादर केली. सदरच्या पत्रावरुन असे दिसून येते की, या संबंधात शासनाने शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडून अहवाल मागितलेला आहे व त्याची प्रत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांना देखील दिलेली आहे. म्हणून सदरच्या पत्राप्रमाणे शिक्षणाधिकारी यांनी त्यांचा चौकशी अहवाल शिक्षण उपसंचालकाकडे पाठवावा असे त्यांनी आयोगासमोर सांगितले व सदरच्या पत्राची प्रत त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध करुन दिली. म्हणून प्रस्तुत प्रकरणी शासनाचे दिनांक २८.९.२०११ च्या पत्राला अनुसरुन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी अपीलकर्त्याच्या तक्रार अर्जाचे संदर्भात अहवाल शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपर यांचेकडे पाठविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ३

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून वर नमुद केल्याप्रमाणे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी अपीलकर्त्यांच्या तक्रार अर्जाचे संदर्भात शासनाकडील दिनांक २८.९.२०११ च्या पत्राला अनुसरुन योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १००४/२०११.**

डॉ. सुप्रिया भोजराज भगत,
१०७३, आर्शिवादनगर, एन.आय.टी. संकुल,
नागपूर - ४४० ०२४. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
मेडिकल, नागपूर.

श्री. दोरवे,
जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्य प्रशासकीय अधिकारी,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
मेडिकल, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक २८.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे डॉ. दिक्षित, उपअधिष्ठाता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक २३.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज

... २

सादर करुन डी.एम.बी. नियुक्ती अंतर्गत सहाय्यक प्राध्यापक पदाकरिता व १२० दिवसाकरिता दिनांक २२.२.२०११ च्या जाहिरातीनुसार व दिनांक ११.३.२०११ च्या मुलाखतीत डॉ. सुप्रिया भगतला डावल्याबद्यल नियमबाहय नेमणूकीबाबत माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ६.४.२०११ च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील अधिष्ठाता यांचेकडे दिनांक २१.४.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १९..५.२०११ रोजी देण्यात आला व त्यामध्ये उमेदवारांच्या निवड प्रक्रियेच्या संदर्भातील इतिवृत्ताची प्रत अपीलकर्तीस पुरवावी असा आदेश दिला. त्यानुसार त्यांना विभागीय निवड मंडळाचे इतिवृत्तांची प्रत प्राप्त झाली. मात्र ज्या उमेदवारांची निवड झालेली आहे ती निवड योग्य ते कारण दर्शवून झालेली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्तीचा दिनांक २३.३.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २८.३.२०११ रोजी प्राप्त झाली होती. त्याला अनुसरुन अपीलकर्तीस दिनांक ६.४.२०११ च्या पत्राने विभागीय निवड समितीने दिनांक १६.३.२०११ व दिनांक १९.३.२०११ च्या निवड केलेल्या उमेदवारांच्या इतिवृत्ताची प्रत उपलब्ध करुन दिली. सदरच्या विभागीय निवड समितीच्या बैठकीचे इतिवृत्ताची प्रत अपीलकर्तीस उपलब्ध झाली असे सुनावणीस त्यांनी आयोगासमोर मान्य केले. मात्र सदरच्या निवडीमध्ये दिलेली कारणे योग्य नाही असे अपीलकर्तीचे म्हणणे आहे. तथापी निवड केलेल्या उमेदवारांच्या गुणवत्तेची बाब आयोगाचे कार्यकक्षेमध्ये येत नाही. त्यासाठी अपीलकर्तीने योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद मागणे योग्य होईल. तथापी अपीलकर्तीस जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ६.४.२०११ च्या पत्राने माहिती अधिकाराखालील अर्जान्वये मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्तीचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-    दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०००/२०११.

श्री. भिमराव भेमटु टेंभूर्णे,
रा. विदर्भ हॉउसींग कॉलनी,
जिल्हा परिषद चौक, हनुमान मंदिरा मागे,
ता. जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. एच. पवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
आरोग्य सेवा, नागपूर मंडळ,
दिक्षाभुमी जवळ, नागपूर.

श्री. ठाकरे,
जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्य प्रशासकीय अधिकारी,
आरोग्य सेवा, नागपूर मंडळ,
दिक्षाभुमी जवळ, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.१०.२०११)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक २१.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन माझ्या

... २

पत्नीला कालबध्द पदोन्नती व सहाय्यक अधिक्षकाची पदोन्नती आज पावेतो न मिळाल्याबद्यल व सिनॅरिटी चुकीची दाखविल्याबाबत दोन मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्यांचा दिनांक २१.३.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक ३०.३.२०११ च्या पत्राने माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले. अपीलकर्त्याने दिनांक ११.४.२०११ ला माहितीचे शुल्क भरले व त्यादिवशी एकूण २१ पानांची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. त्याबाबतची पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविली. मात्र सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाल्याचे त्यांना स्मरण होत नाही असे त्यांनी सागितले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा सदरच्या माहितीची एक जादा प्रत अपीलकर्त्यास आयोगासमोर विनामुल्य उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत करुन समाधान व्यक्त केले. अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १००२/२०११.

श्रीमती पुष्पा डी. सुद,
सुदव्हिझन, ४१०/४, पहिला माळा,
लुबीनीनगर, मेकोसाबाग जवळ,
नागपूर - ४४० ००४. **..... अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२.

जनमाहिती अधिकारी तथा,
अवर सचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.१०.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक २०.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. चव्हाण, मुख्य प्रशासकीय अधिकारी हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी यांचेतर्फे श्रीमती प्रज्ञा घाटे, कक्ष अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक १०.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन

... २

अपीलकर्ती ही प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदावर कार्यरत असून त्यांना पदोन्नती मिळावी या संदर्भात त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापी त्यांचा माहितीचा अर्ज अवर सचिव, यांनी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेकडे हस्तांतरण केला. तथापी त्यांनी शासन स्तरावरुन माहिती मागितलेली होती. म्हणून त्यांनी माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना देण्याबाबतचा अधिकार शासनाने प्रदान केलेला आहे काय याबाबत त्यांना माहिती पाहिजे आहे. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव यांचेवतीने उपस्थित असलेले कक्ष अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्तीने मागितलेली माहिती ही संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेशी संबंधित असल्याने त्यांचा माहितीच्या अधिकारातील मुळ अर्ज संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेकडे दिनांक ३०.११.२०१० च्या पत्राने हस्तांतरीत केला व त्या पत्राची प्रत अपीलकर्तीस उपलब्ध करुन देऊन त्यांना असे कळविले की, आपल्या माहिती अर्जाबाबत पुढील पत्रव्यवहार संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे कार्यालयाशी करावा असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच कक्ष अधिकारी यांनी आयोगापुढे असेही सांगितले की, अपीलकर्ती ही प्रयोगशाळा तंत्रज्ञ आहे त्यांनी कालबध्द पदोन्नतीकरिता शासनास माहिती अधिकारात अर्ज केला होता. प्रयोगशाळा हे पद गट-क असल्याने या संवर्गातील आस्थापना विषयक बाबीवर संचालक हे सक्षम असल्याने त्यांचेकडे अर्ज पाठविण्यात आला. त्याला अनुसरुन संचालक यांनी दिनांक १३.१०.२०१० च्या पत्राने अपीलकर्तीस माहिती उपलब्ध करुन दिलेली असून शासन स्तरावरुन पुन्हा तीच माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तसेच गट-क व गट-ड या संवर्गातील आस्थापना विषयक बाबींवर कार्यवाही करण्यासाठी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन हे सक्षम आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात संचालकांनी अपीलकर्तीस माहिती उपलब्ध करुन दिल्याचे नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेकडील दिनांक १३.१०.२०१० च्या पत्राने पाठविलेली माहिती अपीलकर्तीस प्राप्त झाल्याची त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्तीच्या

माहिती अधिकारातील माहिती देण्याबाबतचे अधिकार शासनाने संचालकांना प्रदान केल्याबाबतची माहिती अपीलकर्तीस प्राप्त होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सुनावणीत आयोगापुढे सांगितले. तसेच अपीलकर्तीने आयोगापुढे असेही सागितले की, Maharashtra Government Servants Regulation of Transfers and Prevention of delay in Discharge of Official Duties Act, २००५ नुसार सचिव हे विभागाचे प्रमुख आहेत. म्हणून मंत्रालयातील जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमुद केले.

५. अपीलकर्ती तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ती हया प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदावर कार्यरत आहेत. प्रयोगशाळा हे पद गट-क असल्याने या संवर्गातील आस्थापना बाबींवर संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई हे सक्षम असल्याने सदरचा माहितीचा अर्ज संचालकांकडे पाठविण्यात आलेला आहे. म्हणून माहितीच्या अर्जातील माहिती देखील उपलब्ध करुन देण्यास संचालक हे सक्षम आहेत अशी माहिती अपीलकर्तीस शासन स्तरावरुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्तीचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अपीलकर्तीस असे कळवावे की, प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही करणेस संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई हे सक्षम आहेत सदरची माहिती अपीलकर्तीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०९६- १०९८/ ११.१०.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०१३/२०११ व अपील क्रमांक १०१४/२०११.

श्री. श्रीराम फकीराजी भोगे,
गणेश वार्ड, ता. पवनी, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

सौ. पुष्पाबाई श्रीराम भोगे,
गणेश वार्ड, ता. पवनी, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. आ. डो. पेंदराम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख,
भंडारा.

श्री. जे. एस. राठोड,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपअधिक्षक, भूमी अभिलेख,
ता. पवनी, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.१०.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता आणि त्यांची पत्नी यांनी दिनांक ३०.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये वर नमुद केलेले दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता/अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत तसेच उत्तरवादी हे हजर आहेत. त्याच प्रमाणे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे एकच असल्यामुळे दोन्ही अपीलाची एकत्रित सुनावणी घेण्यात आली.

२. **अपील क्रमांक १०१३/२०११ :-** अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक २९.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, भूमी अभिलेख, पवनी यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन मौजा पवनी गट नं. ५८४ जमीनीवर आक्षेप अर्ज दिनांक २४.२.२०११ व लोकशाही दिन अर्ज

... २

दिनांक ७.२.२०११ यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना समाधानकारक माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २९.४.२०११ चा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्त्यास दिनांक २१.५.२०११ रोजी माहितीचे शुल्क भरण्याबाबत पत्र पाठविण्यात आले. त्यानुसार अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले व अपीलकर्त्यास दिनांक २१.५.२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, भंडारा यांचेकडे दिनांक ३०.५.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. सुनावणीनंतर अपीलकर्त्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १८.७.२०११ रोजी असे कळविले की, आपले माहितीच्या अर्जाप्रमाणे पवनी येथील गट नं. ५८४ मो.मा.क्र. २३०/४ तसेच लोकशाही दिनी दिनांक ७.२.२०११ च्या अर्जावर उपअधिक्षक, भूमी अभिलेख, पवनी यांनी जी कार्यवाही केली त्या केलेल्या कार्यवाहीच्या सत्यप्रती नियमानुसार फीचा भरणा करुन उपअधिक्षक, भूमी अभिलेख, पवनी यांचे कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावे असे अपीलकर्त्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पत्र दिले. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २२.७.२०११ रोजी प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे पत्र पाठवून माहितीचे शुल्क भरुन घेऊन माहिती घेऊन जाणेबाबत पुन्हा कळविले. त्यानुसार अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक ५.८.२०११ रोजी हजर झाले. त्यावेळी मात्र अपीलकर्त्याने नकाशा घेण्याची जरुरत नाही असे लिहून दिले. कारण नकाशाची मुळ प्रत आक्षेपामध्ये जोडलेली आहे असे अपीलकर्त्याचे म्हणणे होते.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्याच्या दिनांक २९.४.२०११ च्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन दिनांक २१.५.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

५. **अपील क्रमांक १०१४/२०११ :-** अपीलकर्ती यांचे वतीने त्यांचे पती श्री. श्रीराम फकीराजी भोगे यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २९.४.२०११ रोजी उपअधिक्षक, भुमी अभिलेख, पवनी यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन मौजा पवनी शिट नं. २६, प्लॉट नं. २२११ घरावर बँकेचा बोझा कमी करण्यासाठी सर्व कागद दिले असता अर्ज दिल्यापासून किती दिवसाच्या आंत बोझा कमी (फेरफार) घेता येतो हयाची नियमाची माहिति त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २१.५.२०११ च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. परंतु त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, भंडारा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली व सुनावणी नंतर दिनांक १८.७.२०११ च्या पत्राने अपीलकर्तीस असे कळविले की, पवनी येथील शिट नं. २६, प्लॉट नं. २२११ चा दिनांक १८.११.२०१० रोजी बोझा नोंद कमी करणेबाबत उपअधिक्षक, भूमी अभिलेख, पवनी यांचे कार्यालयाने ज्या त्रुटी दर्शविल्या आहेत त्या त्रुटीची पुर्तता करुन आवश्यक ती कागदपत्रे त्यांच्या कार्यालयाकडे दाखल करावी असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्तीस कळविले. प्रथम अपीलाचे निर्णयानुसार अपीलकर्तीने त्रुटीची पुर्तता केलेली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

६. प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्तीचे असे म्हणणे आहे की, त्यांनी बँकेकडून कर्ज घेतले होते व त्या कर्जाची परतफेड केली असून त्याबाबत बँकेचा बोझा कमी करण्याची नोंद करण्यात यावी अशी त्यांची मागणी आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, बँकेच्या कर्जाचा बोझा कमी करावयाचा झाल्यास नियमानुसार बँकेकडे गहाणखत दिलेले आहे त्या नोंदणीकृत दस्ताच्या रिलीजडिड त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाल्या शिवाय बोझा कमी करता येत नाही. म्हणून प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्तीने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे गहाणखताबाबत रिलीजडिड दाखल करण्याची आवश्यकता असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले व सदरच्या त्रुटीची पुर्तता करण्याबाबत अपीलकर्तीस कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्तीने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे रिलीजडिड दाखल करणे आवश्यक असल्याचे दिसून येते. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

... ४

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०१३/२०११ हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ती यांचे अपील क्रमांक १०१४/२०११ हे खारीज करण्यात येत आहे.

३) अपीलकर्ता/अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-            दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०११/२०११.**

श्री. जयंतकुमार गुलाबरावजी देवरकर,
मु. पो. खुबगांव, ता. आर्वी, जि. वर्धा - ४४२ २०१. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. के. एस. तेलरांधे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम विभाग,
वर्धा.

श्रीमती सी. डी. ठाकरे,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपकार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम विभाग,
वर्धा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक २३.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, वर्धा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन दिनांक ४.८.२००९ च्या शासन निर्णयानुसार (२५१५ इतर ग्रामीण विकास कार्यक्रम) सुरु असलेल्या कामांची यादी.

... २

करारनामा व देयकांची संपूर्ण नस्ती. तालुका प्रमाणे किती किती निधींचे वाटप झाले हयांची विस्तृत माहिती अशी ३ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता याचेकडे दिनांक २७.४.२०११ रोजी दाखल केले. त्यानंतर त्यांना दिनांक २९.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी शुल्क भरण्याबाबत पत्र पाठविले. तथापी माहिती ३० दिवसांत त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी शुल्काचा भरणा केला नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर त्यांना काही माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २३.३.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २४.३.२०११ रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही लेखा विभागाशी संबंधित असल्यामुळे दिनांक ३०.३.२०११ च्या पत्राने लेखा विभागाकडे पत्र पाठवून त्यांचेकडून माहिती मागितली. तथापी लेखा विभागाने दिनांक १८.४.२०११ च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांना असे कळविले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही जास्त प्रमाणात असल्यामुळे माहिती काढण्यास ८ ते १० दिवसाचा अवधी लागेल म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २०.४.२०११ च्या पत्राने आपण मागितलेली माहिती संबंधितांकडून तयार करणे सुरु आहे. परंतु माहिती जास्त प्रमाणात असल्याने मुदतीपेक्षा ८ ते १० दिवसाचा कालावधी लागेल असे अपीलकर्त्यास कळविले. सदरचे दिनांक २०.४.२०११ चे पत्र पोस्टाने पाठविल्याबाबत जावक रजिस्टरचा पुरावा जनमाहिती अधिकारी यांनी दाखविला. परंतु सदरचे पत्र अपीलकर्त्यास पोस्टाने प्राप्त झाले नाही असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दाखल केले. कार्यकारी अभियंता यांनी प्रथम अपीलाची सुनावणी ठेवली होती. परंतु अपीलकर्ता सदरच्या सुनावणी हजर होऊ शकले नाही. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात माहिती तयार झाली व अपीलकर्त्यास दिनांक ३०.६.२०११ च्या पत्राने ३४७ पानांची माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांना त्यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक २ च्या माहितीच्या संदर्भातील नस्तीतील सर्व कागदपत्रे त्यांना मिळाली नाही असे त्यांनी नमुद केले.

तसेच मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भात तालुका निहाय किती निधी वाटप झालेला आहे याची माहिती त्यांना मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सुनावणीत सांगितले. यावर जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सागितले की, अपीलकर्त्याचा मुद्या क्रमांक २ च्या माहिती संदर्भातील नस्ती निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याचे त्यांनी मान्य केले व मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भात देखील तालुका निहाय निधी वाटपाबाबत वस्तुस्थिती उपलब्ध करुन देण्याचे त्यांनी मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक २ च्या संदर्भातील माहिती बाबतची नस्ती निरिक्षणासाठी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी व निरिक्षणानंतर त्यांना आणखी कागदपत्रे त्यांनी मागणी केल्यास ती त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भात तालुका निहाय वाटप केलेला निधी संबंधातील वस्तुस्थिती देखील उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ११०३- ११०५/ १२.१०.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०२५/२०११.

श्री. विकास अजाबराव मडावी,
मु. पो. कोलारा, ता. चिमुर, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. एन. पांडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, चिमूर, जि. चंद्रपूर.

श्री. अशोक ब. वैद्य,
जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कोलारा (तु.),
ता. चिमूर, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.१०.२०११)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक १०.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कोलारा (तु.), ता. चिमूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन शालेय पोषण आहार योजना व पाण्याचे व्यवस्थेविषयी एकूण १० मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीमध्ये त्यांना एप्रिल २००७,

... २

ऑगस्ट २००७, डिसेंबर २००९ या महिन्याची माहिती मिळाली नाही. तसेच प्रपत्र नमुना अ-१ ची माहिती मिळाली नाही. तसेच काही देयकांची बिले मिळाली नाही असे त्यानी आयोगापुढे सांगितले. याबाबत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक व प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती संकलित करुन दिनांक १३.४.२०११ च्या पत्राने विनामुल्य उपलब्ध करुन दिली आहे. पुन्हा अपीलकर्ता त्यांचे कार्यालयात हजर राहिल्यास त्यांनी मागितलेल्या माहितीचे निरिक्षणासाठी कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात येतील. त्यांनी पुन्हा त्यातील ज्या माहितीची आवश्यकता आहे ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कागदपत्राचे निरिक्षण करण्यासाठी तारीख व वेळ लेखी कळवावी व सदरचे पत्र प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्याने त्या दिवशी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून कागदपत्रे निरिक्षण करुन घ्यावे व त्यांना पाहिजे असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०२९/२०११.

श्री. अशोक भाऊरावजी भेदरे,
वार्ड नं. १, मु. पो. ता. पारशिवनी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
ता. पारशिवनी, जि. नागपूर.

श्री. टी. सी. काळे,
जनमाहिती अधिकारी तथा,
कृषी अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी,
ता. पारशिवनी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.७.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, पारशिवनी यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन सन २००९-१० मध्ये श्रीमती कमलाबाई रईतराम भेदरे हिने फळबागाचा प्रस्ताव दाखल केला नाही. तथापी या नावावर प्रस्ताव कोणी दाखल केला आहे त्याबाबतची त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांनी माहितीचे शुल्क रुपये १००/- भरुन त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील तालुका कृषी अधिकारी, पारशिवनी यांचेकडे दिनांक १२.१.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १९.४.२०११ रोजी देण्यात आला व त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देऊन

... २

माहितीचे शुल्क व्याजासह परत करण्याबाबत प्रथम अपीलाचा निर्णय दिला. त्याप्रमाणे त्यांना माहिती प्राप्त झाली. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानुसार त्यांना माहितीचे शुल्क रुपये १००/- व्याजासह परत मिळाले नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आायोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्यास दिनांक ९.१२.२०१० च्या पत्राने माहितीचे शुल्क भरणा करण्याबाबत कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने मागितलेली माहिती तयार करण्यात आली व अपीलकर्त्याने माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केल्यामुळे अपीलकर्त्यास माहिती घेऊन जाण्याबाबत भ्रमणध्वनीवरुन कळविण्यात आले. तथापी अपीलकर्ता माहिती घेण्यास कार्यालयात आले नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील तालुका कृषी अधिकारी, पारशिवनी यांचेकडे दाखल केले व प्रथम अपीलाचे निर्णयाला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक २०.४.२०११ च्या पत्राने रजिस्टर पोस्टाद्वारे आवश्यक ती माहिती पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानुसार त्यांना माहितीचे शुल्क रुपये १००/- व्याजासह मिळाले नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, प्रथम अपीलाचे निर्णयानुसार अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क रुपये १००/- व्याजासह परत करण्याबाबत त्यांनी मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास प्रथम अपीलाचे निर्णयानुसार माहितीचे शुल्क रुपये १००/- व्याजासह परत करावे व त्याची पोच घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ११०८- ११०९/ १७.१०.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०२८/२०११.

श्री. प्रशांत अशोक सत्राळकर,
ऑल सेंट हाऊस कंपाऊंड,
व्ही.सी.ए. समोर, सदर, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
गार्डीनर हायस्कूल,
कामगार न्यायालयाचे मागे, नागपूर.

श्री. पी. पी. चौहान,
जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्याध्यापिका,
गार्डीनर हायस्कूल,
कामगार न्यायालयाचे मागे, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.१०.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ३.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, गार्डीनर हायस्कूल, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन गार्डीनर हायस्कूल मधील शिक्षकांचे सन १९९६-९७, १९९७-९८ व १९९८-९९ या वर्षाची जेष्ठता यादी व श्रीमती प्रिया चौहान तसेच श्री. मोसेस पालपार्ती यांचे संबंधात एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले. त्याप्रमाणे त्यांनी माहितीचे शुल्क भरले. तथापी त्यांना मुद्या क्रमांक २ व ५ ची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... २

३.	जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ३.३.२०११ चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांना नावाने त्यांचेकडे प्राप्त झाला नाही. अपीलकर्त्याने सदरचा माहितीचा अर्ज राज्य जनमाहिती अधिकारी या नावाने केलेला होता तो मुख्याध्यापिका या नावाने केलेला नाही. तथापी अपीलकर्त्याने दिनांक ७.४.२०११ रोजी प्रथम अपील त्यांचेकडे दाखल केले. सदरचे प्रथम अपील त्यांचेकडे दिनांक ८.४.२०११ रोजी प्राप्त झाले. त्यानुसार अपीलकर्त्याने १ ते ५ मुद्यांवर माहिती मागितली होती. म्हणून सदरची माहिती तयार करण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक ११.४.२०११ च्या पत्राने माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले. त्यानुसार अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले व अपीलकर्त्यास दिनांक ६.५.२०११ च्या पत्राने १ ते ५ मुद्यांची माहिती व वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली. सदरच्या दिनांक ६.५.२०११ च्या पत्राने पाठविलेली माहिती अपीलकर्त्याचे वतीने त्यांच्या पत्नीने स्विकारल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. परंतु त्यांना मुद्या क्रमांक २ व ५ म्हणजे श्रीमती प्रिया चौहान व श्री. मोसेस पालपर्ती यांचे संबंधात शैक्षणिक पात्रताबाबतचे मागितलेले प्रमाणपत्र त्यांना मिळाले नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. यासंबंधात जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याने मुद्या क्रमांक २ व ५ बाबत मागितलेली माहिती ही त्रयस्थपक्षाशी संबंधीत असल्याने त्यांना माहिती देण्याबाबत विचारणा केली असता त्रयस्थपक्ष म्हणून त्यांनी अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन देऊ नये असे श्रीमती प्रिया चौहान व श्री. मोसेस पालपर्ती यांनी लेखी कळविले. त्यामुळे सदरची माहिती ही वैयक्तिक असल्यामुळे अपीलकर्त्यास देता आली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असेही सांगितले की, अपीलकर्त्याने शाळेकडे अनेकवेळा त्रास देण्याच्या हेतुने माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन नेहमी माहिती मागत असतात. यामध्ये अपीलकर्त्याचा मानसिक त्रास देण्याचा हेतु असतो. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे तब्येतीवर देखील त्यांचा अनिष्ठ परिणाम झाला असून केवळ वैयक्तिक त्रास देण्याच्या हेतुने अपीलकर्ता श्रीमती प्रिया चौहान व श्री. मोसेस पालपर्ती यांची माहिती मागत आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे जनहित नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती देणे योग्य होणार नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने माहिती अर्जातील मुद्या क्रमांक २ व ५ मध्ये श्रीमती प्रिया चौहान व श्री. मोसेस पालपर्ती यांच्या शैक्षणिक अर्हतेबाबत माहिती मागितलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणातील कामकाजात पारदर्शकता असणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेता अपीलकर्त्यास शैक्षणिक अर्हतेबाबत माहिती उपलब्ध करुन दिल्यास शाळेच्या कामकाजातील पारदर्शकता दिसून येईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक २ व ५ च्या संबंधात श्रीमती प्रिया चौहान व श्री. मोसेस पालपर्ती यांचे शैक्षणिक अर्हतेबाबतची शाळेकडे उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १११०- १११२/ १७.१०.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०२७/२०११.**

श्री. मिलींद म. देशमुख,
१४-अ, खरे टाऊन, श्रीकृष्ण रेसीडेंसी,
शंकरनगर, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
नविन प्रशासकीय भवन क्रमांक २,
तिसरा माळा, नागपूर.

श्री. सिध्दार्थ गायकवाड,
जनमाहिती अधिकारी तथा,
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
प्रशासकीय भवन क्रमांक १,
पहिला माळा, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.१०.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.७.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. व्ही. एम. कावळे, सहाय्यक संचालक, वित्त व लेखा हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक २८.२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन नागपूर येथील मागासवर्गीय मुलींच्या तिन्ही वसतीगृहात देण्यात आलेल्या मुलींच्या प्रवेशाची यादी व प्राप्त अर्जाची यादी, सन २०१०-११ मधील माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून मागासवर्गीय मुलींच्या तिन्ही वसतीगृहातील प्रवेश दिलेल्या मुलींची यादी त्यांना प्राप्त झाली. मात्र त्यामध्ये ३ मुलींना विशेष मार्क असूनही त्यांना प्रवेश न देता त्यापेक्षा कमी मार्क असलेल्या मुलींना प्रवेश मिळाल्याबाबत त्यांनी आयोगापुढे सांगितले.

... २

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २८.२.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही मागासवर्गीय मुलींच्या ३ वसतीगृहाची मागितलेली असल्यामुळे त्यांनी दिनांक ४.३.२०११ च्या पत्राने गृहपाल, संत मुक्ताबाई मुलींचे वसतीगृह, मागासवर्गीय मुलींचे वसतीगृह, सिव्हील लाईन व मागासवर्गीय मुलींचे वसतीगृह, महाल या ३ मागासवर्गीय वसतीगृहाची माहिती त्यांनी मागितली व त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. त्यानंतर सदरची माहिती त्यांचेकडे प्राप्त झाली व दिनांक २४.३.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले. त्यानुसार अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा केला व त्या दिवशी दिनांक २४.३.२०११ रोजी अपीलकर्त्यास तिन्ही वसतीगृहाच्या मुलींना प्रवेश दिल्याची यादी उपलब्ध करुन दिली. तसेच अपीलकर्त्याच्या मागणीनुसार हजेरी पटाची प्रत देखील प्रथम अपीलाचे निर्णयानुसार उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र प्रवेश दिलेल्या मुलींमध्ये जास्त मार्क असलेल्या मुलींना प्रवेश न देता कमी मार्क असलेल्या मुलींना प्रवेश दिल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, या संबंधात संबंधित गृहपालाची विभागीय चौकशी सुरु असल्याचे त्यांनी आयोगापुढे सागितले. तथापी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १११३- १११४/ १७.१०.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०२६/२०११.

श्री. मारोती हिरालाल लारोकर,
न्यु आशिर्वाद नगर, गिरोला(कारधा)
ता. जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, रामटेक,
जि. नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा,
नगर परिषद, रामटेक,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.७.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. तथापी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १.७.२०११ रोजी माहिती अधिकाराखाली द्वितीय अपील दाखल केलेले आहे. त्यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्त्याने दिनांक ७.५.२०११ रोजी

... २

जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, रामटेक यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन दिनांक १८.१.२०१० ते दिनांक ७.४.२०११ या कालावधीत अवैध बांधकाम पाडण्याबाबत अर्ज सादर केला होता. त्याबद्दल काय कार्यवाही करण्यात आली याची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हे देखील हजर झाले नाही म्हणून प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास अद्याप पर्यंत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यास त्यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास अद्याप माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यास सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०३९/२०११ व अपील क्रमांक १०४०/२०११.

श्री. उमेश बाजीराव कुकडे,
मु. पो. कुनघाडा (रै), ता. चामोर्शी,
जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. जी. मंतलवाड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
ता. चामोर्शी, जि. गडचिरोली.

श्री. एम. एस. राऊत,
जनमाहिती अधिकारी तथा,
कृषी अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी,
ता. चामोर्शी, जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१०.२०११)**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये वरील प्रमाणे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. दोन्ही अपीलामध्ये अपीलकर्ता हे एकच आहेत. त्याचप्रमाणे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे देखील एकच असल्यामुळे दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी एकत्रित घेण्यात आली.

२. **अपील क्रमांक १०३९/२०११ व अपील क्रमांक १०४०/२०११ :-** अपीलकर्त्याने दोन्ही अपीलामध्ये दिनांक २०.३.२०११ व दिनांक १९.३.२०११ रोजी माहितीचा अर्ज सादर करुन एका अर्जामध्ये संपूर्ण चामोर्शी

... २

तालुक्यामध्ये किती शेत तळे मंजूर आहेत त्यांचा तपशील व शेततळयाचे इस्टीमेटची कॉपी. तसेच संपूर्ण तालुक्यातील नालाबंदीबाबत माहिती व नालाबंदीचे इस्टिमेटची कॉपी इत्यादी बाबत माहिती मागितलेली होती. त्याचप्रमाणे अपीलकर्त्याने अपील क्रमांक १०४०/२०११ मध्ये मुतनुर येथील किती शेततळे चालू आहेत त्या शेततळयाचे अंदाजपत्रक देण्यात यावे. तसेच मुतनुर व पांढरी भटाळ येथे किती नालाबंदी मंजूर आहे व त्याचे इस्टिमेंटची प्रत त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपील क्रमांक १०३९/२०११ मधील माहितीच्या अर्जाचे संदर्भात दिनांक १८.५.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. त्याच प्रमाणे अपील क्रमांक १०४०/२०११ मधील माहितीच्या अर्जाचे संदर्भात त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३०.३.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र इस्टिमेंटची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही व सदरची माहिती ते दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्याना विनामुल्य माहिती प्राप्त होणे आवश्यक आहे असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचे अपील क्रमांक १०३९/२०११ मधील दिनांक ३०.३.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २०.४.२०११ रोजी प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक १८.५.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. त्याचप्रमाणे दिनांक १४.६.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास पुन्हा असे कळविले की, आपण मागितलेल्या माहितीचे एकूण पेजेस २९३५ पाने होतात. सदरच्या पानांची माहिती आपणास विनामुल्य उपलब्ध करुन देण्यासाठी रुपये ५८७०/- खर्च अपेक्षित आहे. सद्यःस्थितीत या स्तरावर निधी उपलब्ध नसल्यामुळे आपणास माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. तथापी निधी उपलब्ध होताच आपणास माहिती पाठविण्यात येईल. तत्पुर्वी या कार्यालयात येऊन माहितीची पाहणी करावी असे अपीलकर्त्यास त्यांनी कळविले आणि पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की, त्यांनी उपविभागीय कृषी अधिकारी यांना दिनांक १४.४.२०११ रोजी पत्र पाठवून रुपये ५८७०/- चा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले.

४. याबाबत अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडील दिनांक १८.५.२०११ चे पत्र व दिनांक १४.६.२०११ चे पत्र प्राप्त झाले. ते दारिद्रयरेषेखालील असल्यामुळे त्यांना ही

माहिती विनामुल्य मिळावी म्हणून जनमाहिती अधिकारी यांचेकडे निधी उपलब्ध झाल्यानंतर त्यांना संपूर्ण माहिती विनामुल्य देण्यात यावी. म्हणून प्रस्तुत प्रकरणी जनमांहिती अधिकारी यांनी उपविभागीय कृषी अधिकारी यांचेकडून निधी प्राप्त झाल्यानंतर सदरची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे पुन्हा निधी प्राप्त करण्यासाठी स्मरणपत्र पाठवावे व त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.

५. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे अपील क्रमांक १०४०/२०११ च्या संदर्भात असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा दिनांक १९.३.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २१.३.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्यास दिनांक ३०.३.२०११ रोजीच्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यात आली व त्या पत्रामध्ये असे नमुद केले की, आपण मागितलेल्या माहितीचे एकूण १३३ पाने आहेत. त्यासाठी विनामुल्य माहिती देण्यासाठी रुपये २६६/- खर्च अपेक्षित आहे. सद्य:स्थितीत त्यांचे स्तरावर निधी उपलब्ध नसल्यामुळे निधी उपलब्ध करुन देण्याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडे कळविण्यात आलेले आहे. निधी उपलब्ध होताच आपणास माहिती पाठविण्यात येईल. तत्पुर्वी आपण माहितीची पाहणी करुन आपले समाधान करुन घेण्यात यावे असे अपीलकर्त्यास त्यांनी कळविले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की, त्यांनी दिनांक ३०.३.२०११ च्या पत्राने निधी उपलब्ध करुन देण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी, गडचिरोली यांचेकडे पत्र व्यवहार केलेला आहे. मात्र अद्यापपर्यंत निधी प्राप्त झालेला नाही. तथापी जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, यापुर्वी आयोगाने त्यांचेकडील अपील क्रमांक ५४८/२००९ निर्णय दिनांक १०.९.२००९ च्या निर्णयात असे नमुद केलेले आहे की, अपीलकर्ता हे दारिद्ररेषेखालील असल्यामुळे त्यांना ५० पेजेसची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. म्हणून प्रस्तुत प्रकरणी देखील अपीलकर्त्यास त्यांनी ५० पेजेसची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे आयोगापुढे मान्य केले व या प्रकरणात अपीलकर्त्यास ५० पेजेसची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्याबाबत अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्यता दिली. म्हणून दोन्ही अपीलाचे संदर्भात अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम

अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर अपीलकर्त्याचे दोन्ही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०३९/२०११ हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) जनमाहिती अधिकारी यांना अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात वरिष्ठ कार्यालयाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास ते दारिद्रयरेषेखालील असल्यामुळे सर्व माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तथापी याबाबत वरिष्ठ कार्यालयास पुन्हा निधी उपलब्ध करुन देण्यासाठी स्मरणपत्र द्यावे व त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०४०/२०११ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे अपीलकर्त्याने मागितलेली माहितीचे स्वतः अवलोकन करावे व त्यांना आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या ५० छायांकितप्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

४) अपीलकर्ता यांनी त्याकरिता हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांना लेखी तारीख व वेळ कळवून उपस्थित राहावे व अपीलकर्ता हे स्वतः उपस्थित झाल्यानंतर (अन्य कोणास उपस्थित राहण्याची परवानगी नाही) त्यांचेकडे सदरची नस्ती जनमाहिती अधिकारी यांनी निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १११७- ११२०/ १८.१०.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०३८/२०११.**

श्री. ललीतराव पाटील,
न्यु कॉलनी, मगंळवारी झोन क्र. १० कार्यालयाचे मागे,
नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. पी. भिवगडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त,
मंगळवारी झोन क्र. १०,
महानगरपालिका, नागपूर.

श्री. व्ही. डब्ल्यु. गभणे,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपविभागीय अभियंता,
लोककर्म विभाग, मंगळवारी झोन क्रमांक १०,
महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१०.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.३.२०१० रोजी मुख्य राज्य माहिती आयोग, मुंबई यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ९.१०.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, मंगळवारी झोन क्रमांक १०, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन

... २

श्री. रामप्रसाद यादव आणि इतर यांचे उर्वरित अनधिकृत बांधकाम काढण्याबाबत त्यांनी अर्ज केला होता. परंतु कार्यवाही झाली नाही म्हणून त्यांनी मा.आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दिनांक ९.२.२००९ रोजी अर्ज दिला होता. त्या संबंधात १ ते १५ मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. परंतु त्यांना ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपआयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दिनांक १.१२.२००९ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ९.१०.२००९ चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १५.१०.२००९ रोजी प्राप्त झाला. त्यावेळी तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, श्री. आर. सी. भिवगडे हे होते. त्यांनी अपीलकर्त्यास दिनांक ४.१२.२००९ च्या पत्राने व दिनांक १७.१२.२००९ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी सदरची माहिती अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत देण्यात आली नाही. त्याचे कारण सदरची माहिती अतिक्रमण विभागाशी संबंधित असल्याने विलंबाने माहिती अपीलकर्त्यास देण्यात आल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपआयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दाखल केले व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.१२.२००९ रोजी देण्यात आला व त्यामध्ये अतिक्रमण अधिक्षक यांनी पोलीसांना लिहिलेले मदतीचे पत्राची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात यावी असे नमुद केले. मात्र पोलीसांचे मदतीच्या पत्राची प्रत अद्याप पर्यंत उपलब्ध झालेली नाही असे अपीलकर्त्याने आयोगापुढे नमुद केले. सदरच्या पत्राची प्रत अतिक्रमण अधिक्षक यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचे अपेक्षित आहे असे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तथापी आता सदरच्या पत्राची प्रत अतिक्रमण अधिक्षक यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ३

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा आदेश मिळाल्यापासून विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी ७ दिवसांचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दिनांक १७.१२.२००९ च्या निर्णयात नमुद केल्याप्रमाणे अतिक्रमण अधिक्षक यांनी पोलीसांचे मदतीसाठी जे पत्र पाठविले आहे त्या पत्राची प्रत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तिशः किंवा पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री. आर. पी. भिवगडे यांनी अपीलकर्त्याचा दिनांक ९.१०.२००९ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १५.१०.२००९ रोजी प्राप्त झाला होता. त्या माहिती अर्जाला अनुसरुन ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यानंतर दिनांक ४.१२.२००९ च्या पत्राने अपीलकर्त्यास अंतरीम उत्तर दिले व दिनांक १७.१२.२००९ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली म्हणून सदरची माहिती अपीलकर्त्यास विलंबाने उपलब्ध झालेली दिसून येते. म्हणून या विलंबास तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री. आर. पी. भिवगडे हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस कां करु नये याचा लेखी खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा. अन्यथा पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी श्री. आर. पी. भिवगडे यांचेकडे खुलाश्यासाठी पाठवावी व त्याची पोच त्यांचेकडे प्राप्त करुन द्यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ११२१- ११२३/ १८.१०.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०३६/२०११ व अपील क्रमांक १०३७/२०११.

श्री. पँथर प्रकाश बन्सोड,
सचिव, सिव्हील हयुमन राईटस् प्रोटेक्शन असोशियेशन,
१८०, उंटखाना, मेडिकल रोड, नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्र. कुलगुंरु,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

श्री. डॉ. महेशकुमार येंकी,
जनमाहिती अधिकारी तथा,
कुलसचिव,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१०.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.२.२०१० रोजी मुख्य राज्य माहिती आयोग, मुंबई यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. दोन्ही द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता हे एकच आहेत. तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे देखील एकच असल्यामुळे दोन्ही द्वितीय अपीलाची एकत्रित सुनावनी घेण्यात आली आणि खालीलप्रमाणे निर्णय दिला.

२. **<u>अपील क्रमांक १०३६/२०११</u> :-** अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ५.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

... २

यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना ३० दिवसांत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ७.१०.२००९ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी न घेता दिनांक २१.१०.२००९ च्या पत्राने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिला. मात्र त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा कुलसचिव यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ५.८.२००९ चा माहिती अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ६.८.२००९ रोजी प्राप्त झाला व अपीलकर्त्यास दिनांक ३.९.२००९ च्या पत्राने माहिती अर्जातील माहिती संदर्भात वस्तुस्थिती कळविण्यात आली. त्यामध्ये असे नमुद केले की, मा.कुलगुरु यांनी माजी न्यायाधिश मा. डब्ल्यु. जी. पौनीकर यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत केलेली आहे. सद्यस्थितीत चौकशी प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे आपण माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(ख)(१)(छ)(ज) मधील तरतुदीनुसार सद्यस्थितीत आपणास पुरविता येणार नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले. जनमाहिती अधिकारी यांचे दिनांक ३.९.२००९ चे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र सदरचे पत्र ३० दिवसानंतर त्यांना प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, आता मा.न्यायमुर्ती डब्ल्यु. जी. पौनीकर समितीची चौकशी पूर्ण झालेली आहे.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील प्र कुलगुरुकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.१०.२००९ रोजी निर्गमित केला व त्यामध्ये असे नमुद केले की, मा.न्यायमुर्ती डब्ल्यु. जी. पौनीकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीसमोर चौकशीची कार्यवाही सुरु असल्यामुळे मागितलेली माहिती पुरविण्यासंदर्भात समितीचे अध्यक्ष मा. न्यायमुर्ती डब्ल्यु. जी. पौनीकर यांचा अभिप्राय घेऊन आणि दिलेल्या अभिप्रायानुसार कार्यवाही करण्यात येईल असा प्रथम अपीलीय अधिकारी यांचा

निर्णय दिलेला असल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. तथापी याबाबत अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांनी या माहितीच्या अर्जात मा.न्यायमुर्ती डब्ल्यु. जी. पौनीकर यांच्या चौकशी अहवालाची मागणी केलेली नाही. त्यांनी माहितीच्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे १ ते ४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. ती माहिती त्यांना उपलब्ध होणे जरुरीचे आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक ५.८.२००९ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३.९.२००९ च्या पत्राने अपीलकर्त्यास कलम ८ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविले आहे. तथापी आता मा.न्यायमुर्ती डब्ल्यु. जी. पौनीकर समितीची चौकशी पूर्ण झालेली असल्यामुळे अपीलकर्त्यास त्यांच्या दिनांक ५.८.२००९ च्या माहिती अर्जातील माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकतर्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

६. **<u>अपील क्रमांक १०३७/२०११</u> :-** अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ७.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(१) अन्वये प्राप्त अपीलांवर सुनावणी न घेता आणि सुनावणी प्रक्रियेत अपीलार्थीस सामील करुन न घेता थेट प्राप्त अपीलांवर आदेश पारित करण्याची कार्यपध्दती विद्यापीठातील प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्र कुलगुरु यांचेकडून अवलंबण्यात येते. सदरची कृती माहिती कायद्याचे कोणत्या तरतुदीनुसार किंवा कोणत्या शासन निर्णय, परिपत्रकांप्रमाणे अपीलीय अधिकारी पार पाडीत आहे त्याविषयी कायदेशीर तरतुद असलेले दस्ताऐवज पुरविण्याचे व्यवस्था करावी अशी माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २५.८.२००९ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. परंतु त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील प्र कुलगुरु यांचेकडे दाखल केले. मात्र या प्रकरणातही प्रथम अपीलाची सुनावणी न घेता त्यांचे प्रथम अपील खारीज करण्यात आले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... ४

७. जनमाहिती अधिकारी तथा कुलसचिव यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ७.८.२००९ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दिनांक २५.८.२००९ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली व त्या माहितीमध्ये असे नमुद केले की, केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमुद प्रथम अपीलासंदर्भातील तरतुदींना अधिन राहून प्राप्त अपीलांवर मा.प्र कुलगुरु व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून कार्यवाही घेण्यात येत असते असे त्यांनी कळविले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी न घेता निर्णय निर्गमित करण्यात येत असतात असे त्यांनी आयोगापुढे नमुद करुन प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन त्या सुनावणीस अपीलकर्त्यास त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली पाहिजे असे अपीलकर्त्याने आयोगाचे समोर स्पष्ट केले.

८. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी याचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक ७.८.२००९ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २५.८.२००९ च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्त्याचे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर त्याची सुनावणी घेऊन व अपीलकर्त्याचे म्हणणे ऐकून घेऊन प्रथम अपीलाचा निर्णय देणे अपेक्षित आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०३६/२०११ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या त्यांच्या दिनांक ५.८.२००९ च्या माहिती अर्जातील १ ते ४ मुद्यांवर मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याने प्रथम अपील प्र कुलगुरु यांचेकडे दाखल केले होते. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी न घेता दिनांक २१.१०.२००९ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिला वास्तविक पाहता प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय देणे अपेक्षित आहे. म्हणून याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी भविष्यात अशी पुनर्रावृत्ती करुन नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

३) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०३७/२०११ हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

४) प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याने प्रथम अपील प्र कुलगुरु यांचेकडे दाखल केलेले होते. मात्र त्या प्रथम अपीलाची सुनावणी न घेता व अपीलकर्ता यांचे म्हणणे मांडण्याची संधी न देता प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.२०.२००९ रोजी दिलेला आहे. म्हणून भविष्यात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन व त्यामध्ये अपीलकर्ता यांचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी देऊन प्रथम अपीलाचा निर्णय देण्याची कार्यवाही करावी अशी समज प्रथम अपीलीय अधिकारी यांना देण्यात येत आहे.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ११२४- ११२८/ १८.१०.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०५४/२०११, अपील क्रमांक १०५५/२०११ व अपील क्रमांक १०५६/२०११.

श्री. सुर्यकांत शंकरराव डोफे,
द्वारा - डी. वाय. कानिटकर,
राष्ट्रभाषा रोड, ता. जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

डॉ. माणिक आनंदराव फगणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद, वर्धा.

श्री. गजानन वामनराव ढगे,
जनमाहिती अधिकारी तथा,
कक्ष अधिकारी,
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.१०.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये वर नमुद केलेली तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १९.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. अपीलकर्ता यांचे वतीने डॉ. पाटील हे हजर आहेत. वरील तिन्ही द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता हे एकच आहेत. तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे देखील एकच असल्यामुळे तिन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी एकत्रित घेण्यात आली.

... २

२. **<u>अपील क्रमांक १०५४/२०११</u> :-** अपीलकर्ता यांचे प्रतिनिधीनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन दिनांक १.४.२००८ ते दिनांक ३१.३.२०११ या कालावधीत कार्यरत सर्व पशुधन विकास अधिकारी यांचे दैनंदिनीबाबत, प्रवासभत्ताबाबत व त्यांचे कामकाजाबाबत इत्यादी संदर्भात एकूण ५ मुद्यांची त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे दिनांक २१.५.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ७.४.२०११ चा माहितीचा अर्ज दिनांक १३.४.२०११ रोजी त्यांचेकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयातील श्री. ए. एम. आत्राम, वरिष्ठ सहाय्यक, श्री. आर. टी. दिघ्रसे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) व श्री. आर. जी. चहारे, कनिष्ठ सहाय्यक यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांनी दिनांक २५.४.२०११ रोजी संबंधितांना लेखी पत्र देऊन त्यांचेकडून माहिती मागितली होती. तथापी संबंधित तिन्ही कर्मचाऱ्यांनी त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपीलकर्त्यास कोणतीही माहिती देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे नमुद केले व संबंधित कर्मचाऱ्यांना लेखी दिलेल्या पत्राची प्रत आयोगासमोर सादर केली. त्यावरुन प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, श्री. एम. एम. आत्राम, श्री. आर. टी. दिघ्रसे व श्री. आर. जी. चहारे यांना जनमाहिती अधिकारी यांनी लेखी पत्राने कळविले आहे. त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला दिसून येतो व सदरच्या विलंबास ही तिन्ही कर्मचारी जबाबदार दिसून येतात. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(५) प्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे सहाय्य मागितले असल्यामुळे या तिन्ही कर्मचाऱ्यांना जनमाहिती अधिकारी असे समजण्यात येत आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस कां करु नये याचा लेखी खुलासा त्यांनी

आयोगापुढे सादर करणे आवश्यक आहे. तसेच अपीलकर्त्याच्या दिनांक ७.४.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन त्यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

४. **अपील क्रमांक १०५५/२०११ :-** अपीलकर्ता यांचे प्रतिनिधीनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दिनांक १३.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन दिनांक १.९.२००८ ते दिनांक ३१.३.२०११ या कालावधीची आवकनोंदवही व जावक नोंदवहीची साक्षांकित प्रत तसेच वाहनाचे लॉकबुक अशी एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे दिनांक २१.५.२०११ रोजी दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

५. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १३.४.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता व अपीलकर्त्यास दिनांक १५.६.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. मात्र सदरच्या माहितीमध्ये काही मुद्यांची माहिती अपूर्ण मिळाल्याचे आयोगापुढे नमुद केले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १५.६.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात जी माहिती उपलब्ध होती ती माहिती अपीलकर्त्यास दिल्याचे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

६. **अपील क्रमांक १०५६/२०११ :-** अपीलकर्ता यांचे प्रतिनिधीनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

... ४

यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन दिनांक १.१.२०१० ते दिनांक ३१.१२.२०१० या कालावधीत श्री. प्रदीप थुल, पशुधन पर्यवेक्षक, पशु दवाखाना, रोठा यांचेबद्यल प्राप्त तक्रारीच्या संदर्भात एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ५.३.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली व त्या माहितीमध्ये श्री. प्रदीप थुल यांचेबाबत प्राप्त झालेल्या २ तक्रारींची माहिती दिली. तथापी सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या प्रथम अपीलाचे निर्णयानंतर पुन्हा त्यांना दिनांक २०.४.२०११ रोजी श्री. प्रदीप थुल यांच्या बाबतच्या २ तक्रारी प्राप्त झाल्या. तथापी सदरची माहिती संपूर्ण त्यांना उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी एक स्वतंत्रपणे माहितीचा अर्ज अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे दिनांक ६.४.२०११ रोजी दाखल केला व त्यांच्या कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास कळविल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ४.५.२०११ रोजीच्या पत्राने श्री. प्रदीप थुल यांच्या एकूण ९ तक्रारी पुन्हा अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्या असे त्यांनी आयोगापुढे नमुद करुन याबाबत आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, यापुर्वी त्यांना फक्त ४ तक्रारी दिल्या होत्या. मात्र अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे मागितलेल्या माहितीच्या अधिकारामध्ये ९ तक्रारी प्राप्त झाल्या त्या ९ तक्रारीमध्ये ५ तक्रारी त्यांना मागावून उपलबध करुन दिल्या म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी सुरवातीस त्यांना ९ तक्रारी उपलब्ध करुन दिलेल्या नाही. म्हणून त्यांना अपूर्ण माहिती दिली. म्हणून त्यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

७. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २४.२.२०११ चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही डॉ. एन. बी. रेवतकर यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३.३.२०११ रोजी पत्र लिहून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांचेकडून मागितली. त्याला अनुसरुन डॉ. एन. बी. रेवतकर यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक ३.३.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली व ती माहिती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ५.३.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. सदरच्या माहितीमध्ये श्री. प्रदीप थुल यांच्या

विषयीच्या २ तक्रारी त्यांना उपलब्ध करुन दिल्या. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचेकडे दाखल केले व प्रथम अपीलाचे निर्णयानंतर पुन्हा अपीलकर्त्यास श्री. प्रदीप थुल यांच्या २ तक्रारी दिनांक २०.४.२०११ रोजी उपलब्ध करुन दिल्या. मात्र अपीलकर्त्याने यासंबंधात पुन्हा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागितलेली होती. त्यासंबंधाने पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी डॉ. एन. बी. रेवतकर यांचेकडून माहिती मागितली. त्यावेळी डॉ. एन. बी. रेवतकर यांनी श्री. प्रदीप थुल यांचेबाबत एकूण ९ तक्रारी जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध करुन दिल्या व सदरच्या ९ तक्रारी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ४.५.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिल्या. यावरुन असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी डॉ. एन. बी. रेवतकर यांचेकडे अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील माहिती मागितलेली होती. परंतु डॉ. एन. बी. रेवतकर यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. अपीलकर्त्याने हीच माहिती अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे मागितली असतांना त्यावेळी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये श्री. प्रदीप थुल यांच्या तक्रारींची संख्या ९ असल्याचे नमुद केले. म्हणून पहिल्या माहितीच्या अर्जात सुरुवातीच्या काळात डॉ. एन. बी. रेवतकर यांनी श्री. प्रदीप थुल यांच्या तक्रारीच्या संबंधात अपूर्ण माहिती दिल्याचे दिसून येते. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस कां करु नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगापुढे हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत सादर करावा. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

**१) अपील क्रमांक १०५४/२०११**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०५४/२०११ हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दिनांक ७.४.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी श्री. ए. एम. आत्राम, श्री. दिग्रसे व श्री. चहारे यांना लेखी पत्राने कळवूनही त्यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला असल्यामुळे वर नमुद केल्याप्रमाणे त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस कां करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत आयोगाकडे करावा अन्यथा त्यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल यांची कृपया नोंद घ्यावी.

३) तसेच प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचे प्रथम अपील दिनांक २१.५.२०११ दाखल होऊन त्यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिला नाही. म्हणून त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये त्यांचेकडे सोपविलेली जबाबदारी पार पाडलेली नाही. त्याकरिता त्यांना समज देण्यात येत असून त्यांनी भविष्यात अशा प्रकारची पुनर्रावृत्ती करु नये.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत जनमाहिती अधिकारी यांनी श्री. ए. एम. आत्राम, श्री. दिग्रसे व श्री. चहारे यांच्याकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी व त्याची पोच त्यांचेजवळ प्राप्त करुन घ्यावी.

**२) अपील क्रमांक १०५५/२०११**

५) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०५५/२०११ हे खारीज करण्यात येत आहे.

**३) अपील क्रमांक १०५६/२०११**

६) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०५६/२०११ हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

७) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दिनांक २४.२.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन सदरची माहिती डॉ. एन. बी. रेवतकर यांचेकडे संबंधित असल्याने त्यांचेकडून लेखी पत्राद्वारे मागितलेली होती. मात्र डॉ. एन. बी. रेवतकर यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे वर नमुद केल्याप्रमाणे श्री. प्रदीप थुल यांचे तक्रारीच्या संदर्भातील अपूर्ण माहिती दिलेली दिसून येते. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस कां करु नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगापुढे १५ दिवसांचे आंत सादर करावा.

८) सदरच्या निर्णयाची एक प्रत जनमाहिती अधिकारी यांनी डॉ. एन. बी. रेवतकर यांचेकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी व त्याची पोच त्यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी.

९) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ११२९- ११३५/ १९.१०.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०५१/२०११.**

श्री. पांडुरंग कारुजी तितरमारे,
श्री गुरुदेव नगर, नंदनवन,
नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. बी. चलवदे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय अधिक्षक, कृषि अधिकारी,
विभागीय कृषि सहसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. एस. के. दिक्षित,
जनमाहिती अधिकारी तथा,
तांत्रिक अधिकारी,
विभागीय कृषि सहसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.७.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १९.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक १८.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी विभागीय कृषी सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर कार्यालय यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर येथे दिनांक १६.६.२०१० रोजी सुनावणीच्या वेळी तसेच आदेशात नमुद

... २

केल्याप्रमाणे आपण राज्य माहिती आयोगाला माहिती दिल्याप्रमाणे १,५६,९१०/- रुपयांचे मजूरांचे पगार पत्रकाचे मुखपृष्ठ दिल्याची माहिती दिल्याप्रमाणे मुखपृष्ठांच्या छायांकित प्रमाणित प्रतीबाबत ३ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना अपेक्षेप्रमाणे माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही तालुका कृषि अधिकारी, हिंगणघाट, जि. वर्धा यांचेशी संबंधित असल्याने सदरचा माहितीचा अर्ज त्यांनी तालुका कृषि अधिकारी, हिंगणघाट यांचेकडे दिनांक १९.३.२०११ रोजी हस्तांतरण केला. तालुका कृषि अधिकारी, हिंगणघाट यांनी अपीलकर्त्यास दिनांक ८.४.२०११ रोजी माहितीचे शुल्क भरण्याचे पत्र दिले. अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क दिनांक १०.५.२०११ रोजी भरणा केले व अपीलकर्त्यास दिनांक २५.५.२०११ रोजी तालुका कृषि अधिकारी, हिंगणघाट यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. तथापी त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांना माहिती मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्त्यास दिनांक २५.५.२०११ रोजी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तालुका कृषि अधिकारी, हिंगणघाट यांनी त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ११३६- ११३७/ १९.१०.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०५२/२०११.**

श्री. बाबुलाल मोरबाजी म्हैस्के,
२६०, कुकडे ले आऊट, पो. भगवाननगर,
नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
नागपूर.

श्री. संजय बाजीराव,
जनमाहिती अधिकारी तथा,
शिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय,
सिव्हिल लाईन, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.१०.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १९.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. अवताळे, स्वियं सहाय्यक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ४.५.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन राजस्व मामला क्रमांक ५६३/एलएनडी-१८/२००१-०२ मधील आदेश दिनांक १५.९.२००१ व राजस्व मामला क्रमांक ३१८/एलएनडी-

... २

१८/२००७-२००८ मधील आदेश दिनांक ५.१२.२००७ या दोन्ही आदेशाच्या प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. मात्र सदरच्या आदेशाच्या प्रती त्याना प्राप्त झाल्या. मात्र सदरच्या आदेशामध्ये चुक झालेली असल्याचे त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यानी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास त्यांनी दिनांक १.६.२०११ च्या पत्राने व प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर दिनांक १९.७.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र सदरचा आदेश चुकीचा काढलेला आहे असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले. तथापी माहिती अधिकाराखाली उपलब्ध असलेली माहिती त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. मात्र सदरच्या आदेशाच्या गुणवत्तेबाबतची बाब आयोगाचे कार्यकक्षेत येत नाही. म्हणून याबाबत अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाखाली सक्षम अधिकाऱ्याकडे दाद मागणे योग्य होईल. तथापी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०५३/२०११.**

श्री. डॉ. अशोक बी. जाधव,
७०२, विक्रांत, आठ रस्ता चौक,
लक्ष्मीनगर, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगर रचना विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. आर. एस. भूते,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपअभियंता,
नगर रचना विभाग,
नागपूर महानगरपालिका. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १९.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. सी. एस. झाडे, नगर रचनाकार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ७.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगर रचना विभाग, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन पुर्ती सुपर बाजार जवळ सायंटिफिक हॉलची पार्कींग जागा कोणती आहे याबाबत त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. परंतु सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... २

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ७.३.२०११ चा माहितीचा अर्ज लक्ष्मीनगर झोन कडून त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १७.३.२०११ रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक १५.४.२०११ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. त्याचप्रमाणे प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे देखील अपीलकर्त्यास संबंधित जागेच्या योजनेची प्रत (Plan) शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावयास कळविले. त्यानुसार अपीलकर्त्याने संबंधित नस्तीची पाहणी केली होती. त्यावेळी अपीलकर्त्याने जागेच्या योजनेच्या प्रतीची (Plan) ची जरुरी नाही असे नमुद केले. मात्र आज आयोगासमोर संबंधित जागेच्या योजनेच्या (Plan) च्या प्रतीची त्यांना आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. म्हणून अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरुन जनमाहिती अधिकारी यांचेकडून जागेच्या योजनेची (Plan) ची प्रत प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी हजर राहून जागेच्या योजनेच्या प्रतीचे शुल्क भरुन जागेच्या योजनेची (Plan) प्रत प्राप्त करुन घ्यावी. जनमाहिती अधिकारी यांचेकडे अपीलकर्ता यांनी शुल्क भरल्यानंतर जागेच्या योजनेची (Plan) प्रत उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ११४०- ११४१/ १९.१०.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०६४/२०११.

श्री. महादेव बाजीराव वाघमारे,
मु. कवडसी (रोडी), नेताजी वार्ड,
पो. तळोधी (नाईक), ता. चिमूर,
जि. चंद्रपूर - ४४२ ९०३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. एम. पांडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, चिमूर, जि. चंद्रपूर.

श्री. पी. डब्ल्यु. अल्लीवार,
जनमाहिती अधिकारी तथा,
सचिव,
ग्राम पंचायत, चिमूर, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.१०.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांचेवतीने श्री. राजूरकर हे उपस्थित होते त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दिनांक २८.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, चिमूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन दिनांक १.४.२००५ ते दिनांक ३१.३.२०११ पर्यंत शासनाकडून मिळालेले अनुदान, निधी व ग्रामपंचायत कडून मिळालेल्या निधीची माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक

... २

२५.४.२०११ च्या पत्राने असे कळविले की, ग्रामपंचायतमध्ये उपलब्ध निधीच्या तरतुदीनुसार आपण मागितलेल्या माहितीच्या सत्यप्रती पुरविणे शक्य नाही. त्यामुळे आपण कार्यालयात हजर राहून आपण मागितलेल्या माहितीचे अवलोकन करुन घ्यावे. तथापी त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चिमूर यांचेकडे दिनांक २३.५.२०११ रोजी दाखल केले. मात्र गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चिमूर यांनी देखील माहितीचे अवलोकन करुन घेण्याचा निर्णय दिला. तथापी माहिती मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २८.३.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन दिनांक २५.४.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की, ग्रामपंचायत मध्ये मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती काढण्यासाठी निधीची तरतुद नसल्यामुळे माहितीच्या झेरॉक्स प्रती आपणास उपलब्ध करुन देणे शक्य नाही. कारण अपीलकर्ता हे दारिद्रयरेषेखालील असल्यामुळे त्यांनी विनामुल्य माहिती मागितलेली आहे. तथापी आपण माहितीचे अवलोकन करुन घेण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात हजर राहावे. तथापी अपीलकर्ता ग्राम पंचायत कार्यालयात माहितीचे अवलोकनाकरिता आले नाही.

४. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही फार मोठया प्रमाणात असल्यामुळे व अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही ६ वर्षाच्या कालावधीची असल्यामुळे सदरच्या माहितीच्या झेरॉक्स काढण्यास सुमारे २००००/- रुपये खर्च अपेक्षित आहे व एवढा खर्च पेलण्याची ग्रामपंचायतची आर्थिक स्थिती नाही म्हणून अपीलकर्त्याने ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित राहून रेकॉर्डचे निरिक्षण केल्यानंतर त्यांना रुपये १०००/- पर्यंत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे शक्य आहे. म्हणून प्रस्तुत प्रकरणी ग्रामपंचायतीची आर्थिक परिस्थिती समाधानकारक नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी ग्रामपंचायत कार्यालयात हजर राहून माहितीचे निरिक्षण करुन घेऊन रुपये १०००/- पर्यंत माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ताचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ३

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून रेकॉर्डचे निरिक्षण करुन घ्यावे व निरिक्षणानंतर त्यांना पाहिजे असलेल्या माहितीचे रुपये १०००/- पर्यंतच्या माहितीच्या प्रती जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०६७/२०११.

श्री. प्रशांत शंकरराव पोपटकर,
३०२, कस्तुरबा लायब्ररी जवळ,
गांधी चौक, सदर, नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. किशोर काळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
ग्रंथपाल,
डॉ. वि. भि. उपाख्य भाऊसाहेब कोलते ग्रंथालय,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नॉर्थ अंबाझरी रोड, रामदासपेठ, नागपूर - ४४० ०१०.

श्री. सुरेश रंदई,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक ग्रंथपाल,
डॉ. वि. भि. उपाख्य भाऊसाहेब कोलते ग्रंथालय,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नॉर्थ अंबाझरी रोड, रामदासपेठ, नागपूर - ४४० ०१०. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.१०.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक १९.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक ग्रंथपाल, यांच्याकडे माहितीचा अर्ज सादर करुन वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान

... २

संस्था, नागपूरचे माजी संचालक व उपरोक्त संस्थेचे अर्थशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. अ. ब. टोंगो यांनी नागपूर विद्यापीठाकडून अर्थशास्त्र विषयामध्ये आचार्य पदवी प्राप्त करण्याकरिता लिहिलेल्या संपूर्ण प्रबंधाची सत्यप्रत मागितली होती. त्याचप्रमाणे डॉ. प्रमोद कमलाकर लाखे यांनी आचार्य पदवी प्राप्त करण्याकरिता लिहिलेल्या संपूर्ण प्रबंधाची झेरॉक्स सत्यप्रत मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी निवडक पेजेस देण्याचे कळविले. तथापी त्यानंतर त्यांनी प्रथम अपील ग्रंथपाल यांचेकडे दिनांक १९.४.२०११ रोजी दाखल केले व प्रथम अपीलाचे निर्णयात ७५% पृष्ठांच्या झेरॉक्स प्रती देण्याचा निर्णय पारित करण्यात आला. मात्र अपीलकर्त्यास या दोन्ही प्रबंधाची अभ्यासासाठी संपूर्ण सत्यप्रत हवी असल्यामुळे त्यांना संपूर्ण सत्यप्रती मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १९.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २३.२.२०११ रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे त्रयस्थपक्षांना दिनांक २५.२.२०११ व दिनांक ७.३.२०११ च्या पत्राने त्यांची संमती/असंमती विचारण्यात आली. त्यानंतर दिनांक १८.३.२०११ च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास काही निवडक प्रकरणे उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. मात्र त्या निर्णयावर अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाचे निर्णयात दोन्ही प्रबंधाचे ७५% पेजेस देण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे असे ही निदर्शनास आणून दिले की, ग्रंथालयामध्ये वेगवेगळया प्रकारचे शोध प्रबंध विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी त्यांचे ग्रंथालयात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तथापी प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याकडून कॉपी रॉईट ॲक्टचा भंग होऊ नये म्हणून अपीलकर्त्यास ७५% पाने देण्याचा निर्णय त्यांनी घेतलेला आहे. याबाबत अपीलकर्त्याने आयोगापुढे असे नमुद केले की, त्यांनी यापुर्वी जनमाहिती अधिकारी यांचेकडे कॉपीरॉईट कायद्याचा भंग होणार नाही असे लेखी स्वरुपात हमी दिलेली आहे.

५. प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर कोणत्याही प्रबंधाच्या प्रती हया त्यांच्या ग्रंथालयात संपूर्णपणे पाहण्यासाठी ठेवलेल्या आहेत म्हणून त्यामध्ये कोणत्याही प्रकारची गोपनीयता नाही असे त्यांनी नमुद केले. म्हणून ही बाब लक्षात घेता अपीलकर्त्यास अभ्यासासाठी मागणी केलेल्या दोन्ही प्रबंधाच्या छायांकितप्रती त्यांचेकडून शुल्क भरुन घेऊन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसात जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरुन घेऊन त्यांच्या माहिती अर्जातील मागणी केलेल्या माहितीची छायांकित प्रती व्यक्तिशः उपलब्ध करुन द्याव्यात.

२) अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळी हजर राहून व माहितीचे शुल्क भरुन आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ११४५- ११४७/ २०.१०.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०६६/२०११.**

श्री. सुमेध मोतीराम शिंदे,
दवा बाजार मागे, रामनगर रोड,
चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. डी. घाटोळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
चंद्रपूर.

श्री. के. डी. पल्लडवार,
जनमाहिती अधिकारी तथा,
विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.१०.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.७.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक २०.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, चंद्रपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन श्री. पिंपळकर, वाहक अकस्मात मृत्यु पावला. अनुकंपा योजने अंतर्गत ७ महिन्याचे आंत त्यांचा वारस

... २

मुलगा हयाला त्वरित नौकरी देण्यात आली. त्या संबंधाने त्याला दिलेले नियुक्ती पत्राची प्रत त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे त्यांना कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ७.६.२०११ रोजी विभाग नियंत्रक यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपील त्यांचे खारीज करण्यात आले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २०.४.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्रयस्थपक्षाचे संबंधात असल्यामुळे त्रयस्थ पक्षाची त्याबाबत संमती मागण्यात आली. तथापी त्रयस्थ पक्षानी माहिती देण्याबाबत नकार दिला म्हणून अपीलकर्त्यास दिनांक १४.५.२०११ च्या पत्राने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ११(१) अन्वये त्रयस्थ पक्षाची माहिती देण्यात येऊ नये असे कळविल्यामुळे माहिती देता येत नाही असे अपीलकर्त्यास कळविल्याचे त्यांनी सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील त्रयस्थ पक्षाची माहिती देण्यास विरोध असल्यामुळे प्रथम अपील खारीज केल्याचे सांगितले.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात श्री. पिंपळकर यांचे वारस मुलाला दिलेली नियुक्ती पत्राची प्रत मागितलेली आहे. सदरच्या नियुक्तीची प्रत हे कोणत्याही प्रकारचे गोपनीय स्वरुपाचे कागदपत्र नाही. तसेच सार्वजनिक प्राधिकरणाचे कामकाजात पारदर्शकता दिसण्यासाठी सदरच्या नियुक्ती पत्राची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याबाबत चर्चा करण्यात आली व जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सदरच्या नियुक्ती पत्राची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले व आयोगाचे समोर नियुक्ती पत्राची प्रत अपीलकर्त्याने स्विकृत करुन समाधान व्यक्त केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०८५/२०११.

श्री. भास्कर शामराव वलोकर,
प्लॉट नं. १८४, निलकंठनगर,
हुडकेश्वर रोड, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
ता. काटोल, जि. नागपूर.

श्री. प्रशांत पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा,
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, ता. काटोल, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.१०.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.७.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.१०.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २४.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक १.२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, काटोल यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन गाव गुजरखेडी, ता. काटोल मधील भुमापक क्र. ५, खाते क्र. ४४, त.सा.क्र. ५० चा ७/१२ कोणत्या दस्ताऐवजाच्या आधारे बनविण्यात आलेला आहे तो दस्ताऐवज त्या शेताच्या अधिकार अभिलेखपंजीची प्रत त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना दिनांक १०.२.२०११ च्या पत्राने तहसीलदार, काटोल यांनी असे कळविले की, आपल्या माहिती अधिकार

अर्जानुसार तलाठी सा.क्र. ५०, धरतवाडा यांना संबंधित रेकॉर्ड या कार्यालयात सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार तलाठी यांनी असा अहवाल सादर केला की, मौजा गुजरखेडी येथील अधिकार अभिलेखपंजी मागील २५ ते ३० वर्षापासून तलाठी दप्तरला उपलब्ध नाही व त्याबाबत कोणतीही नोंद दप्तरला नाही. त्याबाबत या कार्यालयाचे रेकॉडरुममध्ये सुध्दा मौजा गुजरखेडी येथील अधिकार अभिलेखपंजीचा शोध घेतला परंतु सदर्हु रेकॉर्ड या कार्यालयाचे रेकॉर्डरुमला पण उपलब्ध नाही असे त्यांनी कळविले. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील तहसीलदार, काटोल यांचेकडे दिनांक ९.३.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ८.४.२०११ रोजी देण्यात आलेला असून त्यामध्ये असे नमुद केले की, सद्यःस्थितीत तहसील कार्यालयाकडे उपलब्ध असलेले फेरफार पंजीच्या प्रती अपीलकर्त्यास शुल्क घेऊन उपलब्ध करुन घेता येतील असा प्रथम अपीलाचा निर्णय दिला. मात्र त्या निर्णयाने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १.२.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन त्यांनी अपीलकर्त्यास दिनांक १०.२.२०११ च्या पत्राने असे कळविले की, संबंधित तलाठी यांचेकडे आपण मागितलेल्या अभिलेखाची कोणतीही माहिती उपलब्ध नाही. कारण सदरची माहिती ही सुमारे २५ ते ३० वर्षापुर्वीची आहे. त्यामुळे आपणास माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलकर्त्यास कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील तहसीलदार, काटोल यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णयाला अनुसरुन सद्यःस्थितीत तहसीलदार, काटोल यांचे कार्यालयात उपलब्ध असलेले फेरफारपंजीच्या प्रती अपीलकर्त्यास त्यांनी उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले आणि सदरच्या फेरफारपंजीच्या प्रती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत करुन त्याबाबत समाधान व्यक्त केले. तथापी अपीलकर्त्यास फेरफार संबंधी आक्षेप आहेत. म्हणून अपीलकर्त्याने आक्षेपाबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ खाली योग्य त्या प्राधिकरणाकडे अपील दाखल करणे संयुक्तिक होईल. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या फेरफारपंजीच्या नोंदी उपलब्ध करुन दिल्या असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ११५१- ११५३/ २४.१०.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०८६/२०११.**

श्री. विरेंद्र गजानन दहिकर,
२३९, चॉक्स कॉलनी, कामठी रोड,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
गोसीखुर्द प्रकल्प मंडळ,
सिंचन सेवा भवन, सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. के. टी. मडावी,
जनमाहिती अधिकारी तथा,
कार्यकारी अभियंता,
गोसीखुर्द उजवा कालवा विभाग,
ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.७.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.१०.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २४.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. एस. पी. रामटेके, शाखा अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक २२.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, गोसीखुर्द उजवा कालवा उपविभाग क्र. ५, ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन आर्थिक वर्ष २००९-२०१० मध्ये आपल्या उपविभागांतर्गत झालेल्या करारनामा क्र. ब १/११/डि

... २

एल/०९-१०, क्र. १६३८/निली/०९, दिनांक ३१.८.२००९ चा शेडयुल ए, शेडयुल बी व वर्क ऑर्डरची साक्षांकित प्रती मागितलेली होती. तसेच सदर करारनाम्यांतर्गत किती कामे झालीत, सुरु आहेत व किती कामे शिल्लक आहेत याची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्याचप्रमाणे सदर काम करणाऱ्या एजंसी/कंत्राटदाराला किती देयके देण्यात आली त्या देयकांची सत्यप्रत मागितली होती व किती रक्कम त्यांची शिल्लक आहे याची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती मिळाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील अधिक्षक अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प मंडळ, नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपील फेटाळण्यात आल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले व आयोगापुढे असेही सांगितले की, ते दारिद्रयरेषेखालील असल्यामुळे त्यांनी माहितीच्या अर्जाला तिकीट लावण्याची आवश्यकता नाही. तसेच त्यांना विनामुल्य माहिती मिळणे आवश्यक असल्याचे देखील त्यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले व त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २२.११.२०१० चा माहितीचा अर्ज उपविभागीय अभियंता, गोसीखुर्द उजवा कालवा, उपविभाग क्र. ५, ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर यांचेकडे केला होता. तथापी ते जनमाहिती अधिकारी नसल्यामुळे त्यांनी दिनांक १०.१२.२०१० च्या पत्राने सदरचा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द उजवा कालवा विभाग, ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर यांचेकडे हस्तांतरण केला व अपीलकर्त्यास दिनांक १०.१२.२०१० च्या पत्राने तसे कळविले. त्यानंतर जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे सदरचा माहितीचा अर्ज दिनांक १८.१२.२०१० रोजी प्राप्त झाला. त्यानंतर जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी अपीलकर्त्यास दिनांक ७.२.२०११ रोजीच्या पत्राने असे कळविले की, उपविभागीय कार्यालयाकडून आपला माहितीचा अर्ज प्राप्त झाला असून त्या अर्जामध्ये नियमान्वये कोर्ट फी स्टॅम्प तिकीट लावलेली दिसून येत नाही. बी.पी.एल.शिधापत्रिका प्रमाणपत्र व कौटुंबिक शिधापत्रिका साक्षांकित प्रत जोडलेली नाही. वरील प्रमाणे पुर्तता केली नाही म्हणून अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे

... ३

सांगितले. वास्तविक पाहता जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयाकडे उपविभागीय कार्यालयाकडून दिनांक १०.१२.२०१० च्या पत्राने पाठविलेला माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक १८.१२.२०१० रोजी प्राप्त झाला होता. म्हणून दिनांक १८.१२.२०१० नंतर ३० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक त्या पुर्तता करण्याबाबत कळविणे आवश्यक होते. मात्र प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीनंतर दिनांक ७.२.२०११ च्या पत्राने पुर्तता करण्याबाबत कळविले आहे. तसेच अपीलकर्ता हे दारिद्ररेषेखालील असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(६) च्या तरतुदीनुसार ज्या व्यक्ती दारिद्रयरेषेखालील आहेत त्यांना कोणतीही फी भरण्याची आवश्यकता नाही अशी तरतुद असल्यामुळे अशा व्यक्तींनी अर्जाला कोर्ट फी स्टॅम्प लावण्याची आवश्यकता नाही. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्त्यास दिनांक ७.२.२०११ च्या पत्राने म्हणजे ३० दिवसाचे मुदतीनंतर विलंबाने पुर्तता करण्यास कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही व या सदरच्या विलंबास जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता हे जबाबदार दिसून येतात. अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन न देता विलंब झाल्याबद्यल जनमाहिती अधिकारी यांना खुलासा विचारला असता त्यांनी आयोगापुढे सांगितले की, कार्यबाहुल्यामुळे अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे त्यांनी नमुद केले. मात्र जनमाहिती अधिकारी यांचा हा खुलासा मान्य करण्यासारखा नाही. कारण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. तशी कार्यवाही जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी केलेली नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसाचे मुदतीत अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे आता अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दिनांक २२.११.२०१० च्या माहिती अर्जातील माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज दिनांक १८.१२.२०१० रोजी प्राप्त होऊनही ३० दिवसांचे मुदतीत अपीलकर्त्यास काहीही कळविले नाही किंवा माहिती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला दिसून येतो. विलंबाबद्यल त्यांनी वर नमुद केल्याप्रमाणे केलेला खुलासा मान्य करता येत नाही म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- शास्तीची कार्यवाही लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली त्यांचे दरमहाचे वेतनातून कपात करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावी.

३) सदरच्या शास्तीची वसुलीची कार्यवाही अधिक्षक अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प मंडळ, सिंचन सेवा भवन, नागपूर यांनी जनमाहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून कपात करुन वर नमुद केलेल्या लेखाशिर्षात जमा करावी व शास्तीची संपूर्ण रक्कम वसुल झाल्यानंतर तसे आयोगास कळवावे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ११५४- ११५७/ २४.१०.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०८३/२०११.**

श्री. प्रभाकर गुलाबराव मस्के,
स्वस्तीक कॉलनी, हिंदनगर, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित प्रमंडळ कार्यालय,
विद्युत भवन, बोरगांव नाका, वर्धा.

श्री. एस. एस. तायडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
कार्यकारी अभियंता (प्रशासन),
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित प्रमंडळ कार्यालय,
विद्युत भवन, बोरगांव नाका, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.१०.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.७.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.१०.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २४.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सागितले की, त्यांनी दिनांक ३.२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रशासन), महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित प्रमंडळ कार्यालय, विद्युत भवन, वर्धा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन मे. जयबजरंग ॲग्रो प्रोसेसिंग प्रायव्हेट लिमिटेड, देवळी हया उच्चदाब ग्राहकांच्या बिलात झालेल्या अनियमीततेबाबत शिक्षा देण्यात आली. त्या शिक्षेच्या संदर्भात त्यांनी दिनांक

... २

४.१२.२००८, दिनांक २४.१२.२००८, दिनांक २०.२.२००९, दिनांक २९.९.२०१० रोजी तक्रार अर्ज दिला होता. त्याअर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना ३० दिवसांत जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील अधिक्षक अभियंता यांचेकडे दिनांक १०.३.२०११ रोजी दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ३.२.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयातील सहाय्यक व्यवस्थापक (एफ व ए) स. व सु. प्र. विभाग, वर्धा यांचेशी संबंधित असल्याने त्यांचेकडून दिनांक ११.२.२०११ रोजी माहिती मागविली. त्यानंतर पुन्हा सहाय्यक व्यवस्थापक (क) यांना स्मरणपत्र दिनांक २८.२.२०११ रोजी पाठवून त्यांचेकडून माहिती मागितली. तथापी त्यांचेकडून माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्त्याने प्रथम अपील अधिक्षक अभियंता यांचेकडे दिनांक १०.३.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपील दाखल झाल्यानंतर सहाय्यक व्यवस्थापक (क) यांना दिनांक २५.८.२०११, दिनांक ३०.८.२०११, दिनांक २.९.२०११, दिनांक १३.१०.२०११ व दिनांक १७.१०.२०११ रोजी पुन्हा पत्र लिहून त्यांचेकडून माहिती मागितली. तथापी सहाय्यक व्यवस्थापक (क) यांचेकडून दिनांक २०.१०.२०११ रोजी माहिती प्राप्त झाली व सदरची माहिती दिनांक २०.१०.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी अपीलकर्त्यास पोस्टाद्वारे पाठविले. मात्र पोस्टाद्वारे पाठविलेली सदरची माहिती अद्यापही अपीलकर्त्यास प्राप्त झालेली नसल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुन्हा दिनांक २०.१०.२०११ च्या पत्राने पाठविलेल्या माहितीची एक जादा प्रत आयोगासमोर उपलब्ध करुन दिली व सदरची माहिती अपीलकर्त्याने स्विकृत केली. मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाल्यामुळे संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. आजच्या सुनावणीत सहाय्यक व्यवस्थापक (क) हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांना मागितलेली माहिती त्यांचे कार्यालयातील श्री. डब्ल्यु. एच. झुंगरे, मुख्य लिपिक

... ३

यांचेशी संबंधित असल्याने त्यांचेकडे जनमाहिती अधिकारी यास दिनांक २८.२.२०११ चे पत्र, दिनांक १५.३.२०११ चे पत्र, दिनांक ११.४.२०११ चे पत्र दिनांक २५.८.२०११ चे पत्र पाठवून माहिती उपलब्ध करुन देण्यास त्यांना सांगितले. मात्र श्री. डब्ल्यु. एस. झुंगरे, मुख्य लिपिक यांनी ३० दिवसांचे नंतरही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे सांगितले. तसेच सहाय्यक व्यवस्थापक (क) यांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की, श्री. डब्ल्यु. एस. झुंगरे, मुख्य लिपिक यांनी माहिती अधिकार खालील अर्जाला अनुसरुन माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अधिक्षक अभियंता यांनी श्री. डब्ल्यु. एस. झुंगरे, मुख्य लिपिक यांना दिनांक १९.१०.२०११ च्या पत्राने कार्यवाही करण्यास कळविले आहे. त्याची प्रत सहाय्यक व्यवस्थापक (क) यांनी आयोगापुढे सादर केली. त्यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही. त्यासाठी श्री. डब्ल्यु. एस. झुंगरे, मुख्य लिपिक हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(५) अन्वये त्यांचे सहाय्य जनमाहिती अधिकारी यांनी मागितल्यामुळे त्यांना जनमाहिती अधिकारी म्हणून संबोधण्यात येत असून विलंबास ते जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस कां करण्यांत येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगापुढे सादर करणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

# **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.२.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. वर नमुद केल्याप्रमाणे सदरची माहिती विलंबाने म्हणजे दिनांक २०.१०.२०११ च्या पत्राने उपलब्ध झालेली दिसून येते. सदरच्या विलंबास श्री. डब्ल्यु. एस. झुंगरे, मुख्य लिपिक हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस कां करण्यात येऊ नये. याचा लेखी खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात आयोगाकडे सादर करावा.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी श्री. डब्ल्यु. एस. झुंगरे, मुख्य लिपिक यांचेकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी व त्याची पोच त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त करावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ११५८- ११६१/ २४.१०.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०९१/२०११.

श्री. ईश्वर भाऊरावजी डोरले,
"वात्सल्य" तडस ले आऊट,
दाते सभागृहासमोर, आवी रोड, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, वर्धा.

जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्याध्यापक,
संजय गांधी हायस्कूल, केळकर वाडी, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.१०.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १.७.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.१०.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २५.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संजय गांधी हायस्कूल, केळझरवाडी, वर्धा यांचेकडे माहे मे २००८ च्या मासिक वेतन देयकाची सत्यप्रत व सेवा पुस्तकाची सत्यप्रतीची माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१०.२०११ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचेकडे लेखी निवेदन सादर करुन माहिती मिळाली असून अपील अर्ज मागे घेत असल्याचे नमुद केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

... २

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०७४/२०११.**

श्री. आय. बी. नन्नावरे,
मारोती वार्ड, ता. हिंगणघाट,
जि. वर्धा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. एम. वैरागडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती, वरोरा, जि. चंद्रपूर.

श्री. अतुल लालाजी मेश्राम,
जनमाहिती अधिकारी तथा,
सचिव,
ग्रामपंचायत, राळेगांव, पो. चारगांव (बुज),
ता. वरोरा, जि. चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.७.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी त्या दिवशी सुनावणी न झाल्यामुळे दिनांक ३१.१०.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक २७.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, राळेगांव, ता. वरोरा, जि. चंद्रपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन त्यांनी एकूण ८

... २

मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, वरोरा यांचेकडे दिनांक ९.४.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या सुनावणीची नोटीस त्यांना उशिरा मिळाली म्हणून ते प्रथम अपीलाच्या सुनावणीस उपस्थित राहू शकले नाही. मात्र त्यानंतरी त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २७.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १.२.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने यापुर्वी देखील अशाच स्वरुपाची माहिती मागितलेली होती व सदरची माहिती अपीलकर्त्यास पुरविण्यात आल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीमध्ये त्यांच्या दिनांक ३०.८.२००८ च्या माहितीच्या अर्जाच्या मुळ प्रतीच्या झेरॉक्स प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. तथापी पुर्वीच्या सचिवांकडून दिनांक ३०.८.२००८ चा माहितीचा अर्ज पुर्वीच्या सचिवाकडून त्यांच्या पदभारात मिळाला नाही म्हणून त्याची सत्यप्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता आल्या नाही. तसेच अपीलकर्त्याने बांधकाम मंजूरी बाबत माहिती मागितलेली आहे त्यासंबंधात ग्रामपंचायत बांधकामाची मंजूरीची माहिती दिल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. तथापी याबाबत अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या एकाच अर्जाला बांधकाम मंजूरी दिलेली आहे. दुसऱ्या अर्जाला बांधकाम मंजूरी दिलेली नाही. म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी ही वस्तुस्थिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.

४. तसेच अपीलकर्त्याने प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, वरोरा यांचेकडे दाखल केले होते. त्याप्रमाणे प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ४.५.२०११ रोजी ठेवण्यात आली होती असे संवर्ग विकास अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र अपीलकर्ता अपीलाचे सुनावणीस हजर झाले नाही. म्हणून अपील खारीज केल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र याबाबत अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, प्रथम अपीलाचे सुनावणीचे पत्र त्यांना उशिरा प्राप्त झाले. म्हणून त्यांना प्रथम अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहता आले नाही.

... ३

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, वरोरा यांचेकडे दाखल केले होते. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचे निर्णयात जनमाहिती अधिकारी यांना अपीलकर्त्यास कोणती माहिती उपलब्ध करुन दिली व कोणती माहिती उपलब्ध करुन दिली नाही यांचा कोणताही ऊहापोह केलेला नाही. म्हणून अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे संमतीने असा निर्णय घेण्यात आला की, प्रस्तुत प्रथम अपीलाची सुनावणी संवर्ग विकास अधिकारी यांनी दिनांक १४.११.२०११ रोजी घ्यावी व त्या प्रथम अपीलाचे निर्णयात जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास अद्यापपर्यंत उपलब्ध करुन दिलेली माहिती व अपीलकर्त्यास उपलब्ध न झालेली माहिती याचा आढावा घ्यावा व अपीलकर्त्यास योग्य ती माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी. तथापी ज्या मुद्यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध होणार नाही त्याची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल. म्हणून संवर्ग विकास अधिकारी यांनी त्यांचेकडे प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. त्यासाठी खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आ दे श

१) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, वरोरा यांनी दिनांक १४.११.२०११ रोजी त्यांचे कार्यालयात प्रथम अपीलाची सुनावणी घ्यावी व त्या सुनावणीच्या वेळी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली माहिती आणि अपीलकर्त्यास उपलब्ध न झालेली माहिती याचा आढावा घेऊन अद्यापपर्यंत जी माहिती उपलब्ध झाली नसेल ती माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तथापी ज्या मुद्यांची माहिती उपलब्ध नसेल त्या मुद्यांची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळवावी.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ११६४- ११६६/ ३१.१०.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०७६/२०११.

श्री. दिलीप गजाननराव खेडीकर,
नयापुरा, राम मंदीर जवळ, प्रेमनगर,
वार्ड नं. ३४, नागपूर - ४४० ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. आर. गणवीर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आरोग्य अधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. एस. एन. गुलगुलवार,
जनमाहिती अधिकारी तथा,
विभागीय अधिकारी,
आरोग्य विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.७.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी त्या दिवशी सुनावणी न झाल्यामुळे दिनांक ३१.१०.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक १३.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी, आरोग्य विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन सौ. अल्काताई दलाल, नगरसेविका तथा अध्यक्ष, आरोग्य व बाजार समिती यांनी पदभार स्विकारल्यापासून त्यांना दिलेल्या त्यांच्या गाडीवर झालेला पेट्रोल खर्च, मोबाईल, टेलिफोन, इत्यादी संबंधात मुद्या क्रमांक a, b, c, d, e, f, g, h, i, j, k, l, m मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र मुद्या क्रमांक b, e, f, g, l या मुद्यांची समाधानकारक माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... २

३. जनमाहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १३.४.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक १५.४.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांना दिनांक ९.५.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचा निर्णयानंतर दिनांक २८.६.२०११ रोजी पुन्हा माहिती दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र सदरच्या माहितीमध्ये मुद्दा क्रमांक बी, ई, एफ, जी, एल या मुद्यांची माहिती त्यांना अपेक्षेप्रमाणे मिळाली नाही असे सांगितले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ९.५.२०११ च्या पत्राने व दिनांक २८.६.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली माहिती आयोगासमोर सादर करण्यात आली. त्यामाहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक बी, ई, एफ, जी, एल या मुद्यांच्या माहितीच्या संदर्भात वस्तुस्थितीदर्शक माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे या मुद्यांची वस्तुस्थितीदर्शक माहिती अपीलकर्त्यास पुन्हा विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले. त्याकरिता अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक बी, ई, जी, एफ, एल या मुद्यांच्या संदर्भात वस्तुस्थितीदर्शक माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ११६७- ११६८/ ३१.१०.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०७५/२०११.

श्री. ओमप्रकाश हिरामण नंदेश्वर,
रा. हिवरा, पो. रतनारा, ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, गोंदिया, जि. गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा,
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, गोंदिया, ता.जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१०.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.७.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी त्या दिवशी सुनावणी न झाल्यामुळे दिनांक ३१.१०.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक १४.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, गोंदिया यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन ग्रामपंचायत हिवरा येथील पाऊस पाणी संकलन योजना व संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना मध्ये झालेल्या चौकशी अहवालाची प्रत त्यांनी मागितलेली होती. तथापी त्याना जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, गोंदिया यांचेकडे दिनांक २३.५.२०११ रोजी दाखल

... २

केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १३.६.२०११ रोजी देण्यात आला व त्यामध्ये असे नमुद केले की, श्री. के. एच. चौरे यांनी अपीलकर्त्यास संपूर्ण माहिती एक आठवडयाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. त्यानुसार अपीलकर्त्यास दिनांक १७.८.२०११ च्या पत्राने त्यांना माहिती मिळाली. परंतु त्या माहितीमध्ये फक्त पाऊसपाणी संकलन योजनेच्या चौकशी अहवालाची प्रत त्यांना मिळाली. मात्र त्या सोबतचे बयानाच्या प्रती मिळाल्या नाही. तसेच संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना अंतर्गत सिमेंट काँक्रीट रोडबाबतचा चौकशी अहवाल त्यांना मिळाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे दोन्ही गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र अपीलकर्त्याने या कार्यालयाकडे दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १३.६.२०११ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देऊन त्या निर्णयात श्री. के. एच. चौरे यांनी संपूर्ण माहिती एक आठवडयाचे आंत अपीलकर्त्यास विनामुल्य द्यावी असा आदेश दिला होता. त्याप्रमाणे अपीलकतर्यास फक्त ग्रामपंचायत हिवरा येथील पाऊसपाणी संकलन योजना याबाबत चौकशी अहवाल अपीलकर्त्यास प्राप्त झाला. मात्र त्या सोबत बयानाच्या प्रती त्यांना मिळालेल्या दिसून येत नाही. तसेच संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनामध्ये झालेली चौकशी व चौकशीचा अहवालाची प्रत त्यांना अद्यापही प्राप्त झालेली दिसून येत नाही.

४. वास्तविक पाहता प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी यांच्या प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार श्री. के. एच. चौरे यांनी एक आठवडण्याचे आंत अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. मात्र त्यांनी संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास दिलेली दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत श्री. के. एच. चौरे यांनी प्रथम अपीलाचे निर्णयानुसार अपीलकर्त्यास ग्रामपंचायत, हिवरा येथील पाऊसपाणी संकलन योजनेच्या चौकशी अहवालामध्ये ज्यांची बयान घेतलेले आहेत. त्या बयानाची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेमध्ये झालेल्या चौकशी अहवालाची सत्यप्रत देखील अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) प्रथम अपीलाचे निर्णयानुसार श्री. के. एच. चौरे यांनी अपीलकर्त्यास एक आठवडयाचे आंत संपूर्ण माहिती कां दिली नाही याचा लेखी खुलासा त्यांना आयोगाकडे हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत सादर करावा. अन्यथा त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाचे कार्यवाहीची शिफारस करण्यात येईल यांची त्यांनी नोंद घ्यावी.

३) जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, गोंदिया यांनी सदरच्या निर्णयाची एक प्रत श्री. के. एच. चौरे यांचेकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी व त्याची पोच त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त करुन घ्यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ११६९- ११७१/ ३१.१०.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०७३/२०११.**

सौ. पुष्पाबाई श्रीराम भोगे,
गणेश वार्ड, ता. पवनी, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. उध्दव शंकरराव ठवकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, (संवसु विभाग)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
ता. जि. भंडारा.

श्री. विलास भगवंतराव लांडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक अभियंता (संवसु उपविभाग),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
ता. पवनी, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१०.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक ७.७.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी त्या दिवशी सुनावणी न झाल्यामुळे दिनांक ३१.१०.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांच्यावतीने श्री. श्रीराम भोगे यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक २१.५.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, पवनी

... २

यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन त्यांना दिनांक १५.११.२०१० रोजी त्यांच्या घराचे स्लॉपमधून सरकारी प्लॉटमध्ये अवैधरित्या विद्युत पुरवठा लावल्यामुळे घरच्या मंडळीचा जीवनमानाचा धोका निर्माण झाला आहे असा अर्ज त्यांनी दिला होता. त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ३१.५.२०११ च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ४.६.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्तीचा दिनांक २१.५.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या माहिती अर्जाला अनुसरुन त्यांचे घराचे स्लॅबवरुन विद्युत पुरवठयाची लाईन टाकल्याबाबत केलेल्या कार्यवाहीचे संदर्भात दिनांक ३१.५.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली व सदरच्या माहितीमध्ये असे कळविले की, श्री. शंकर घुसा भुरे यांना विज पुरवठा करणारी सर्वीस वायर ही फार वर्षापासून त्याच पोलवरुन देण्यात आलेली आहे. तसेच आपले बांधकाम हे त्यानंतरचे आहे तरीसुध्दा आपणास ती सर्वीस वायर हटवून हवी असल्यास त्यासाठी येणारा खर्च आपणास भरावा लागेल व तसे आपण संमतीपत्र सादर केल्यानंतर महाराष्ट्र राज्य विज वितरण कपंनीच्या नियमाप्रमाणे पुढील योग्य कार्यवाही करण्यात येईल अशी माहिती अपीलकर्तीस उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. सदरची दिनांक ३१.५.२०११ ची माहिती अपीलकर्तीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र अपीलकर्तीचे असे म्हणणे आहे की, सदरची सर्वीस वायर ही बेकायदेशीररित्या त्यांचे घरावरुन टाकलेली आहे. तथापी याबाबत जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, दिनांक ६.७.२०११ रोजी श्री. शंकर घुसा भुरे यांनी घर दुरुस्तीचे काम केले. त्यामुळे त्यांचे मीटर व त्याचे घरावरील वायर दुसरीकडे हलवून देण्याबाबतचा त्यांचा अर्ज कनिष्ठ अभियंता, पवनी यांचेकडे करण्यात आला. त्याअनुषंगाने कनिष्ठ अभियंता, पवनी यांनी ३००/- रुपये मिटर हलविण्याची डिमाड श्री. शंकर घुसा भुरे यांना कळविले. त्यांनी त्या रकमेचा भरणा केला. तसेच

सर्वीस वायर श्री. शंकर घुसा भुरे यांनी स्वतः विकत आणली व सदरची सर्वीस वायर मीटर सौ. पुष्पाबाई श्रीराम भोगे यांचे घराचे स्लॅबपासून सुरक्षित अंतरावर हटविण्यात आली आहे. त्यामुळे आता अपीलकर्तीच्या मागणी प्रमाणे कार्यवाही झालेली आहे असे देखील त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

४. अपीलकर्ती, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्तीस दिनांक २१.५.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्तीस दिनांक ३१.५.२०११ च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्तीचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ११७२- ११७४/ ३१.१०.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०७७/२०११.

श्री. डॉ. विनायक श्रीराम इरपाते,
७५, मित्रा नगर, मानेवाडा रोड, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कुलगुरु (अभ्यासमंडळ),
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा,
कुलसचिव/ निवडणूक निर्णय अधिकारी (अभ्यासमंडळ),
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१०.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.७.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.९.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१.१०.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी त्या दिवशी सुनावणी न झाल्यामुळे दिनांक ३१.१०.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

२. तथापी अपीलकर्ता यांनी आयोगाकडे दिनांक ११.७.२०११ रोजी व्दितीय अपील दाखल केलेले आहे. त्यासोबत त्यांनी दिनांक ३.५.२०११ रोजी माहितीचा अर्ज सादर करुन जनमाहिती अधिकारी तथा निवडणुक अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडे Board of Study Sociology

... २

Eleaction - २०११ म्हणजे दिनांक ३.५.२०११ ला अभ्यासमंडळाचे निवडणूक विषयी माहिती मागितलेली होती. सदरच्या माहितीमध्ये समाजशास्त्र मंडळाची निवडणूक निकालासंबंधी त्यांनी माहिती मागितलेली दिसून येते. तथापी त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते. म्हणून प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दिनांक ३.५.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन आवश्यक ती माहिती १५ दिवसात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत त्यांच्या दिनांक ३.५.२०११ च्या माहिती अर्जातील माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ११७५- ११७६/ ३१.१०.२०११